cmyk

## संपादकीय

### पाऊल पडते पुढे !

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) १४८ व्या तुकडीचा यंदाचा पदवीप्रदान तसेच दिक्षांत सोहळा ऐतिहासिकच म्हणावा लागेल. खरे तर दरवर्षी हा सोहळा होत असतो. त्यातील छात्रांचे प्रावीण्य, शिस्तबद्ध संचलन आणि लढाऊ विमानांच्या चित्तथरारक कसरती डोळ्यांचे पारणे फेडत असतात. परंतु, या वर्षीचा सोहळा म्हणजे एका नव्या दिशेचा प्रवासच म्हणावा लागेल. याला कारण म्हणजे महिलांनी टाकलेले पुढचे पाऊल होय. भारतीय सैन्य दलात एनडीएचे एक विशेष स्थान आहे. एकाच ठिकाणी हवाई, नौदल आणि लष्कराचे अधिकारी तयार करण्याच्या हेतूने १९४९ मध्ये या संस्थेची स्थापना झाली.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–३८ | रविवार, दि. १ जुन २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### राज्यात मोसमी वाऱ्याची वाटचाल खोळंबली

मुंबई : नैऋत्य मोसमी वा–यानी शुक्रवारीही वाटचाल केलेली नाही. मागील दोन दिवसांपासून मोसमी वारे एकाच जागेवर रेंगाळले आहेत. दरम्यान, पुढील काही दिवस संपूर्ण राज्यात पावसाचा जोर कमी राहणार आहे. काही भागात हलक्या ते मध्यम सरी बरसतील. मात्र, मुसळधार पावसाची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान विदर्भात पुढील ४ दिवस पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# पीक नुकसान भरपाईच्या रकमेत आता कपात



## राज्य सरकारचा निर्णय; दोन हेक्टरपर्यंतच मिळणार मदत

मुंबई । प्रतिनिधी

**अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, पुराने झालेल्या शेतपिकांच्या नुकसान भरपाईच्या रकमेत राज्य सरकारने कपात केली आहे. तसेच, कमाल तीनऐवजी दोन हेक्टर पर्यंतच मदत देण्याचा निर्णयही घेतला आहे.**

२७ मार्च २०२३ च्या निर्णयानुसार निश्चित नुकसान भरपाई मिळणार आहे. शेतकऱ्यांना किती नुकसान भरपाई द्यावी, याचे निकष राज्य आपत्ती प्रतिसाद निधीअंतर्गत राज्य सरकारने पूर्वीच निश्चित केले होते आणि त्यानुसारच डिसेंबर २०२३ पर्यंत मदत दिली जात होती. मात्र, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने १ जानेवारी २०२४ रोजी एक जीआर काढला. त्यानंतर मदतीचे दर आणि हेक्टरची कमाल मर्यादेत वाढ केली. त्यानुसारच मदत दिली जात होती. राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत निश्चित मदतीचे निकष डावलून मदतीत वाढ करण्यात आली होती. मात्र, सूत्रांच्या माहितीनुसार, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीने जे निश्चित केले, त्या मर्यादेतच नुकसानीसाठी मदत देणे बंधनकारक आहे, असे केंद्राने राज्याला कळविले आहे. त्यानुसार आता पूर्वीच्या म्हणजे २७ मार्च २०२३ च्या निर्णयानुसार निश्चित केलेली नुकसान भरपाई आता दिली जाणार आहे.

## डोनाल्ड ट्रम्प याच्या वक्तव्यावर नरेंद्र मोदी यांनी मौन सोडावे


### काँग्रेसची मागणी, ट्रम्प यांचे ११ व्यांदा शस्त्रसंधीबाबत वक्तव्य



नवी दिल्ली । वृतसंस्था

भारत आणि पाकिस्तानसोबत व्यापार तोडण्याच्या त्यांच्या धमकीमुळे युद्धबंदी झाली, या त्यांच्या ''मित्र डोनाल्डभाई'' (अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प) यांच्या वारंवारच्या दाव्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मौन सोडावे अशी मागणी काँग्रेसने तीव्र केली आहे. भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीत मध्यस्थी करून पान २ वर

# ऑपरेशन सिंदूर इतिहासातील यशस्वी ऑपरेशन–पंतप्रधान मोदी



भोपाळ। वृत्तसंस्था

**पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधत मध्य प्रदेशात एका कार्यक्रमाचे आयोजन तेथील राज्य सरकारच्यावतीने आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी यांनी पाकिस्तानमधील दहशतवाद्यांनी भारताच्या ''नारी शक्ती'' ला आव्हान देऊन स्वतःचा विनाश घडवून आणला, 'ऑपरेशन सिंदूर' हे दहशतवादाविरोधातील भारतीय इतिहासातील सर्वात मोठे आणि सर्वात यशस्वी ऑपरेशन असल्याचा दावाही यावेळी त्यांनी केला.**

पंतप्रधान मोदी म्हणाले की, पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी फक्त रक्त सांडले नाही तर त्यांनी आपल्या संस्कृतीवर हल्ला केला. त्यांनी आपल्या समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला. दहशतवाद्यांनी भारताच्या नारीशक्तीला आव्हान दिले आणि हे आव्हान दहशतवाद्यांसाठी आणि त्यांच्या प्रायोजकांसाठी विनाशात बदलल्याचे सांगितले. पुण्श्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त भोपाळमध्ये आयोजित 'महिला सशक्तीकरण महासंमेलनात' सहभागी होताना म्हणाले. २२ एप्रिल रोजी, लष्कराच्या दहशतवाद्यांनी निसर्गरम्य बैसरन कुरणात २५ पर्यटक, सर्व पुरुष, गोळ्या घालून ठार मारले, ज्यांनी गैर–मुस्लिम म्हणून ओळखल्या जाणाऱ्यांना फाशी दिली. प्रत्युत्तर म्हणून, भारताने ऑपरेशन सिंदूर सुरू केले हल्ल्यात विधवा झालेल्या महिलांना आदर दर्शविण्यासाठी हे नाव देण्यात आले आहे. शत्रुत्वादरम्यान, भारताने पाकिस्तानच्या आत खोलवर पान २ वर

## थोडक्यात...

### हाके दुसऱ्याच्या रिचार्जवर चालणारे– सुरज चव्हाण

मुंबई–लक्ष्मण हाके यांनी आपल्या लायकीत राहावे. फार जास्त बोलू नये, लक्ष्मण हाके ते दुसऱ्याच्या रिचार्जवर चालणारे, त्यांनी आम्हाला शिकवू नये असे सूरज चव्हाण यांनी म्हटले आहे. आमच्या नेत्यावर टिका करताना १० वेळा विचार करावा अन्यथा त्याचा योग्य तो सन्मान केला जाईल अशीही टीका त्यांनी केली आहे.

### उद्धव ठाकरे गट–मनसेच एकत्र येत आंदोलन

मुंबई–गेल्या काही दिवसापासून राज ठाकरे–उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा सुरू असतानाच कल्याण डोंबिवली मधील कल्याण शीळ रोडवर सुरू असलेल्या नवीन पुलाचं सात वर्षापासून संथ गतीने काम सुरू असल्याने दोन्ही पक्ष आक्रमक झाले. शनिवारी मनसे व ठाकरे पक्षातील कार्यकर्ते एकत्र येत आंदोलन करत पुलाची पाहणी केली. या वेळेला शिवसेनेकडून गाजर दाखवत निषेध व्यक्त केला तर मनसेच्या राजू पाटील यांनी चक्क ५०० च्या नोटा दाखवत निषेध केला.

### राज्यातील पहिली मराठा कुणबी सरपंच

तुळजापूर–माहेरी मिळालेल्या मराठा कुणबी प्रमाणपत्राच्या आधारे त्यांनी सासरी तुळजापूर येथील कुंभारी गावात रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या पोटनिवडणुकीत उमेदवारी दाखल केली. त्यांची सरपंच म्हणून निवड झाली. वर्षाराणी सत्यवान दळवे (सासरचे नाव वर्षाराणी संतोष वडणे) या मराठा कुणबी पहिल्या महिला सरपंच असल्याचे सांगितले जाते.

### बिश्नोई गँगच्या गँगस्टरला अटक

यवतमाळ : यवतमाळमधून बिश्नोई गँगच्या गँगस्टरला अटक करण्यात आली आहे. २ वर्षापासून यवतमाळमध्ये वास्तव्यास असणारा भुपेंदर सिंग अनेक गुन्ह्यात आरोपी आहे. भुपेंदरला अमेरिकेतून फंडिंग होत असल्याचा पोलिसांना संशय आहे.

### अहिल्यादेवींच्या जीवनावर चित्रपट येणार–फडणवीस

अहिल्यानगर : अहिल्यादेवींच्या जीवनावर बहुभाषिक चित्रपट येणार असल्याची मोठी घोषणा चौंडीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. चित्रपटाच्या माध्यमातून अहिल्यादेवींचा इतिहास जगासमोर येणार असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले आहे.

### कृषी खातं ओसाड गावची पाटीलकी–कोकाटे


छ. संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगरमध्ये शेतक–यांशी संवाद साधताना कृषिमंत्री माणिकराव कोकोटेंनी पुन्हा एकदा वादग्रस्त वक्तव्य केले आहे. कृषी खातं म्हणजे ओसाड गावची पाटीलकी असल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे. त्यामुळे कोकाटे आपल्या स्वतःच्याच खात्यावर नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### राज्यात कोरोनाचे ८४ नवे रुग्ण

मुंबई: राज्यात काल ८४ नव्या कोरोना रुग्णांची नोंद झाली असून नवीन रुग्णांपैकी ३२ रुग्ण मुंबईत, ठाण्यात १६, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, नाशिकमध्ये प्रत्येकी एक रुग्ण आढळला आहे. राज्यातील एकूण कोरोना रुग्णांची संख्या ६८१ वर गेलीत. तर राज्यात ४६७ सक्रिय रुग्ण आहेत.

## सुप्रिया सुळे परदेशातून आल्यानंतर राष्ट्रवादीच्या एकत्रीकरणावर चर्चा

### आ.रोहित पवार यांचे सूचक वक्तव्य



पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस आणि अजित पवार यांच्या नेतृत्वातील गट पुन्हा एकत्र येणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत. या चर्चांना बळ मिळण्यामागचे प्रमुख कारण म्हणजे काही दिवसांपूर्वी खासदार शरद पवार पान २ वर

## योगी आदित्यनाथ देशातील सर्वात शक्तिशाली मुख्यमंत्री



### सरन्यायाधीशांनी केली तोंड भरून स्तुती

प्रयागराज । वृतसंस्था

भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची प्रशंसा करताना त्यांना देशातील सर्वात शक्तिशाली आणि मेहनती मुख्यमंत्री असल्याचे म्हटले. प्रयागराज येथील पान २ वर

## विदर्भात जोरदार पावसाचा अंदाज; मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात जोर कमी राहणार

पुणे । प्रतिनिधी

विदर्भातील काही भागात जोरदार पावसाची नोंद झाली. मात्र मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातील बहुतांशी भागात पावसाचा जोर कमी झाला. पुढील ५ दिवस विदर्भात पावसाचा जोर राहण्याची शक्यता आहे. तर राज्याच्या इतर भागात पाऊस कमीच राहील, असाही अंदाज हवामान विभागाने दिला. मान्सून वाटचाल शनिवारिही थबकलेली होती. पान २ वर

## भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख

### २२ जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्षाने राज्यातील उर्वरित २२ जिल्हाध्यक्षांची नावे अखेर जाहीर केली आहेत. याआधी पक्षाकडून ५८ जिल्हाध्यक्षांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. बीड जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख यांची वर्णी लागली आहे.**

भाजपकडून ५८ जिल्हाध्यक्षांची यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. मात्र उर्वरित २२ जिल्ह्यांच्या संदर्भात अंतर्गत मतभेद आणि स्थानिक स्तरावरील राजकीय गणितामुळे ही यादी काही काळासाठी रोखून धरली गेली होती. सध्या काही जिल्ह्यांमध्ये चर्चा पूर्ण झाल्यानंतर आणि स्थानिक व केंद्रीय नेत्यांमध्ये समन्वय साधल्यानंतर या उर्वरित जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला पान २ वर

## अंबाजोगाईच्या स्वामी विवेकानंद पतसंस्थेतील आणखी सव्वादोन कोटींचा घोटाळा उघडकीस; १५ जणांवर गुन्हा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**विविध घोटाळ्यांमुळे वादग्रस्त ठरलेल्या अंबाजोगाई येथील स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेतील आणखी एक मोठा गैरव्यवहार उघडकीस आला आहे. पतसंस्थेत सन २००० ते २०१२ या कालावधीतएकूण २ कोटी २९ लाख ९३ हजार ७१७ रुपयांचा अपहार व गैरव्यवहार झाल्याचे विशेष लेखापरीक्षक सतीष काकासाहेब पोकळे यांनी केलेल्या चाचणी लेखापरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी एकूण १५ जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पतसंस्थेचा तत्कालीन अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.**

सतीश पोकळे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पतसंस्थेच्या लेखापरीक्षणात बँक खात्यांतील व्यवहार, रोजकिर्दीतील नोंदी आणि चेक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर विसंगती आढळल्या. काही व्यवहार बँक स्टेटमेंटमध्ये असूनही रोजकिर्दीत नाहीत, काही चेक क्र. नसलेल्या नोंदी आहेत, तर काही रक्कमा रोजकिर्दीत असून बँकेत जमा झाल्याचे पुरावे नाहीत. यामुळे संस्थेच्या आर्थिक विश्वसनीयतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. लेखापरीक्षकांच्या अहवालानुसार, संस्थेतील अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि बँकेतील कर्मचाऱ्यांनी संगनमत करून संस्थेच्या निधीचा अपहार केला. अपहाराची सुरुवात आर्थिक वर्ष २००६०७ पासून झाली असून, संस्थेच्या तत्कालीन प्रमुख पदांवर कार्यरत असलेल्या कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याच्या कार्यकाळातच सर्वाधिक गैरव्यवहार झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. कुरेशी सोबतच या गुन्ह्यात सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा माजी अध्यक्ष भोसले विकास पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका २ टप्प्यांत?

मुंबई । प्रतिनिधी

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका दोन टप्प्यात होण्याची शक्यता आहे. पहिल्या टप्प्यात झेडपी तर दुसऱ्या टप्प्यात मनपा निवडणुका होण्याची शक्यता आहे.**

गेल्या काही वर्षांपासून लोकप्रतिनिधींच्या प्रतीक्षेत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका २०१७ च्या प्रभाग रचनेनुसार करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. मात्र या निवडणुकांसाठी तब्बल एक लाख ईव्हीएम यंत्रांची आवश्यकता पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३० मे २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २३.५० क्विंटल | २,४०१ | २,७४१ | २,६१० |
| ज्वारी/हायब्रिड: ३३.५० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३०२ |
| मका/लोकल:३३.५०क्विंटल | ५,३०१ | ६,७०० | ६,४१७ |
| तूर : १९.५० क्विंटल | ६,५०० | ६,५२६ | ६,५०६ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ३३.०० क्विंटल | २,००० | २,६०० | २,३८६ |
| मुग :०.५० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| सोयाबीन: १६.५० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,४०० | ५,४०१ | ५,४०० |

# लोकनेत्याच्या स्मृतीदिनाची गोपीनाथगडावर जय्यत तयारी

## रामायणाचार्य ढोक महाराजांचे मंगळवारी गोपीनाथगडावर सुश्राव्य कीर्तन

### २ जूनला 'नो प्लास्टिक' उपक्रम, वैद्यनाथ मंदिरात स्वच्छता तर ३ जूनला रक्तदान शिबिर, आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, वृक्ष रोपांचे वाटप यासह विविध उपक्रमांचे आयोजन

परळी वै. । प्रतिनिधी

गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्मृती दिनानिमित्त ३ जून रोजी विविध लोकोपयोगी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. याअनुषंगाने गोपीनाथगड येथे स्मृतीदिनाची जय्यत तयारी सुरु आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यावर अफाट प्रेम करणारे राज्यभरातील असंख्य मुंडेप्रेमी यादिवशी गोपीनाथगड येथे नतमस्तक होऊन आपल्या लाडक्या नेत्याला अभिवादन करणार आहेत, त्यानिमित्त गोपीनाथगड येथे तयारी सुरु आहे.



राज्याच्या पर्यावरण आणि पशूसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मुंडे कुटुंबीय आणि राज्यभरातून असंख्य मान्यवर स्मृती दिनानिमित्त गोपीनाथगड येथे उपस्थित असणार आहेत. यावेळी गडावर रक्तदान शिबीर, वाहन चालकांची आरोग्य तपासणी, पशूसंवर्धन कॅम्प, जनावरांना औषधांचे वाटप, पर्यावरण संवर्धनासाठी विविध पान २ वर

### सोमवारी वैद्यनाथ मंदिरात कापडी बॅग मशीनचे उद्घाटन व स्वच्छता

सोमवार २ जून रोजी सकाळी ११ वा. पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शहरातील आनंदधाम येथे सामाजिक वनीकरण विभागाच्या वतीने वृक्षारोपण तर पर्यावरण विभाग व गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने वैद्यनाथ मंदिरात 'नो प्लास्टिक' उपक्रमाअंतर्गत कापडी पिशवी मशीनचे उद्घाटन, मंदिर परिसरात नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. तत्पूर्वी मंदिरात प्रभू वैद्यनाथाची महाआरती देखील करण्यात येणार आहे, या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

cmyk

## अग्रलेख

# पाऊल पडते पुढे !

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) १४८ व्या तुकडीचा यंदाचा पदवीप्रदान तसेच दिक्षांत सोहळा ऐतिहासिकच म्हणावा लागेल. खरे तर दरवर्षी हा सोहळा होत असतो. त्यातील छात्रांचे प्रावीण्य, शिस्तबद्ध संचलन आणि लढाऊ विमानांच्या चित्तथरारक कसरती डोळ्यांचे पारणे फेडत असतात. परंतु, या वर्षीचा सोहळा म्हणजे एका नव्या दिशेचा प्रवासच म्हणावा लागेल. याला कारण म्हणजे महिलांनी टाकलेले पुढचे पाऊल होय. भारतीय सैन्य दलात एनडीएचे एक विशेष स्थान आहे. एकाच ठिकाणी हवाई, नौदल आणि लष्कराचे अधिकारी तयार करण्याच्या हेतूने १९४९ मध्ये या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेने आपल्या सात ते साडेसात दशकांच्या प्रवासात अनेक पराक्रमी आणि गुणवान अधिकारी देशाला दिले आहेत. परंतु, संस्थेमध्ये मुलींच्या प्रवेशाची तरतूद नव्हती. मात्र, २०२२ मध्ये मुलींकरिताही एनडीएचे अवकाश खुले झाले आणि तीन वर्षांच्या खडतर प्रशिक्षणानंतर १७ मुलींनीही सैन्यदलात अधिकारी म्हणून ऊजू होण्याचा टप्पा गाठला आहे. ही निश्चितच प्रेरणादायी बाब ठरावी.

भारतीय महिला आज सर्वच क्षेत्रामध्ये पुऊषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. वैद्यकीय क्षेत्रापासून अवकाश संशोधनपर्यंत आणि शेतीपासून उद्योजगतापर्यंत सगळ्याच क्षेत्रामध्ये महिला मुक्तपणे मुशाफिरी करताना दिसतात. भारतीय महिलांना पूर्वी सैन्यदलात प्रवेश नव्हता. तथापि, शरद पवार यांच्याकडे संरक्षणमंत्री असताना त्यांनी तीनही सैन्यदल प्रमुखांशी चर्चा करून महिलांच्या समावेशाचा निर्णय घेतला. खरे तर त्यावेळी महिलांच्या भरतीला अनेकांचा विरोध झाला. परंतु, पवार ठाम राहिल्याने महिलांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला. या निर्णयामुळेच आज अनेक महिला तिन्ही दलामध्ये महत्त्वाच्या हुद्द्यांवर काम करीत आहेत. याशिवाय एनडीएमध्येही महिलांना एन्ट्री मिळाली असून, १७ महिला छात्रांच्या रूपाने एका नव्या पर्वाची सुरूवात झाली आहे, असे म्हणायला हरकत नाही. या तुकडीतील श्रुती दक्ष हिचे यश नजरेत भरणारेच ठरावे. ती मूळची हरियाणाची. पण, दक्ष कुटुंब आता नोएडा येथे वास्तव्यास आहे. तिथेच तिचे शिक्षण झाले. तिचे वडील योगेशकुमार दक्ष सेवानिवृत्त विंग कमांडर आहेत. तर मोठी बहीण ही हवाई दलात फ्लाईंग ऑफिसर म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे घरातूनच तिला सैन्यदलात जाण्याचा वारसा मिळाल्याचे दिसते. ३० वर्षांपूर्वी तिचे वडीलदेखील ‘एनडीए’मधून उत्तीर्ण होऊन सैन्यदलात दाखल झाले होते. आज त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत त्यांच्या छोट्या मुलीनेदेखील सशस्त्र सैन्यदलात प्रवेश केला, ही त्यांच्यासह सर्वांसाठीच अभिमानास्पद बाब म्हटली पाहिजे. श्रुती आता इंडियन मिलिट्री अकादमी (आयएमए) येथे पुढील प्रशिक्षणासाठी दाखल होणार आहे. श्रुतीने यावर व्यक्त केलेली भावना अधिक महत्त्वाची होय. माझे हे यश माझ्यासारख्या सशस्त्र सैन्य दलात येऊ पाहणाऱ्या मुलींना निश्चित प्रेरणा देईल, असा विश्वास तिने व्यक्त केला आहे.

श्रुती आणि तिच्या अन्य सहकारी १७ छात्रांनी आपण काय करू शकतो, हे समस्त भारतीयांना दाखवून दिले आहे. देशाच्या कानाकोपऱ्यात अशा अनेक मुली असतील, ज्यांना हे क्षेत्र खुणावत असेल. त्यांच्याकरिता सावित्रीच्या या लेकींची कामगिरी नक्कीच स्फूर्तीदायक ठरू शकते. याशिवाय एनडीएतील अन्य छात्रांनीही आपले खडतर प्रशिक्षण पूर्ण करीत एक मैलाचा दगड पार केला आहे. प्रिन्सकुमार कुशवाह, लकीकुमार, उदयवीरसिंह नेगी यांसारख्या छात्रांनीही आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. मुख्य म्हणजे यातील बहुतेकांना या ना त्या माध्यमातून लष्करी वारसा वा पार्श्वभूमी लाभल्याचे दिसते. हे बघता मार्गदर्शन हा घटक किती महत्त्वाचा असतो, याची प्रचिती यावी.

भारतीय लष्कराने वेळोवेळी आपला पराक्रम देशाला आणि जगाला दाखवून दिला आहे. पाकिस्तानसारख्या देशाला आपण तीन युद्धांमध्ये पराभूत केले असून, अन्य लढायांमध्येही त्यांच्यावर मात केली आहे. ‘ऑपरेशन सिंदूर’च्या माध्यमातूनही लष्कराने पाक व त्यांना आडून मदत करणाऱ्या ड्रॅगनचे मनसुबे उधळून लावले आहेत. अशा या बलशाली, पराक्रमी संरक्षण विभागाची ताकद आपल्याला भविष्यात आणखी वाढवायची आहे. म्हणूनच त्यांच्या मार्गातील सर्व प्रशासकीय अडथळे आपल्याला दूर करावे लागतील. त्याचबरोबर सैन्य दलाचे पाऊल अधिक सशक्तपणे आणि दमदारपणे पुढे पडण्यासाठी यंत्रणांना सिस्टिममध्ये सुधारणा कराव्या लागतील. त्याचाच हा एक महत्वपुर्ण टप्पा म्हणात येईल.

# धर्म न्याय आणि लोककल्याणाचा आदर्श म्हणजे राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर-आ.प्रकाश सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

**पुण्यश्लोक राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांनी २८ वर्ष राज्य कारभार करत असताना शेतकरी कष्टकरी सर्वसामान्य यांच्यासह मानव जातीच्या कल्याणासाठी धर्म न्याय आणि लोककल्याणांचा आदर्श राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांनी निर्माण केला असल्याचे मत आमदार प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केले.**



पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती माजलगाव तालुक्यात विविध उपक्रमाने उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले होते तर प्रमुख अतिथी म्हणून मोहनराव जगताप,बहुजन नेते बाबुराव पोटभरे,अरुणराव राऊत,नितीनराव नाईकनवरे,डॉ. अशोकराव तिडके, राजेश घोडे,दत्ता कांबळे,ज्ञानेश्वर मेंडके, यशवंतराव गायके, बबनराव सरवदे,प्रा. प्रकाशराव गवते, अंकुशराव गांडगे, शिवप्रसाद खेत्री, अण्णासाहेब वगरे, सभापती जयदत्त नरवडे, संभाजीराव शेजुळ, विजय धायगुडे, विशाल देवकते, अशोकराव देवकते, नारायण सातपुते,ज्ञानेश्वर सरवदे, शिवाजी कुरे, धनंजय सोळंके,रामभाऊ आबुज, सुभाषराव गडदे,संतोष देवकते, अभिजीत कोंबडे,वसंत परसे, तुकाराम चोरमले, राम कानडे,नितीन कांडुरे,बाळासाहेब सोनसळे,प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर, अविनाश कांडुरे, ॲड.गणेश सजगणे, भागवतराव गायकवाड,रोहित वगरे,पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेशराव मोगरेकर,महेंद्र मस्के,श्यामसुंदर पांचाळ,शंकर काळे,राज अर्जुन, हनुमान सरवदे, भगवान धरपडे, किसनराव हराळ, आदी उपस्थित होते.पुढे बोलताना आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी वेळप्रसंगी हातामध्ये शस्त्र घेऊन आदर्श राज्यकारभार केला आहे आणि या मातेच्या स्मारकासाठी माजलगाव नगर परिषदेच्या पाण्याच्या फिल्टर जवळ दोन गुंठे जागा देत असल्याचे जाहीर केले आहे. लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त दिनांक ३० मे रोजी रात्री १२:०० वाजता राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेल्या मराठवाड्यात तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या मंदिरात येथे अहिल्या घाटावर दीपा उत्सव करण्यात आला आणि ३०० तोफांची सलामी देऊन जयंती उत्साह साजरी केली आणि दिनांक ३१ मे रोजी सकाळी ११:०० वाजता लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि शहरातून अहिल्यादेवी होळकर चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत मोटरसायकल रॅली काढण्यात आली आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस महिलांच्या हस्ते व आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते आरती करण्यात आली या ठिकाणी दिवसभर आम लोकांनी अभिवादन केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे संयोजक विलास नेमाने,अशोकराव डोने,बाबा वगरे, पंडित वगरे,गणेश हजारे,अनिल आवाड,शुभम हजारे,हरी गलांडे, मल्हार कुंडकर, नवनाथ थेटे, आदींनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास महिला वृद्ध तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सुनंदा प्रशांत कोरडे अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीच्या वतीने श्रीमती सुनंदा प्रशांत कोरडे यांना अहिल्यारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संघर्षशील जीवन जगत, आप्तस्वकियांच्या मृत्यूचे दुःख पचवत, सामाजिक जबाबदारी समर्थपणे पार पाडल्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यासोबतच संयोजकाच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा पुण्यश्लोक अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. माजलगाव येथील सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात हा देखणा व नेत्रदीपक सोहळा पार पडला.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख होते तर उद्घाटक म्हणून संस्कार भा प्रांताध्यक्ष स्नेहलताई पाठक होत्या. प्रमुख व्याख्याते म्हणून इतिहास अभ्यासक डॉ.अशोक बांगर यांनी अनमोल मार्गदर्शन केले. यावेळी अमरनाथ खुर्पे, डॉ .प्रशांत पाटील, देविदास नागरगोजे, प्रकाश दुग्गड, अभय कोकड, तुकाराम येवले आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अशोक वाडेकर व गोविंद गोचडे यांनी केले. यावेळी बोलताना प्रमुख व्याख्याते डॉ. अशोक बांगर म्हणाले की, राजाच्या मनामध्ये रयतेप्रती कोणता भाव आहे? हा विषय सगळ्यात महत्वाचा असतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मनामध्ये, ' हे राज्य व्हावे ही तो श्रींची इच्छा' हा भाव होता. आणि याच भावनेतून ईश्वराला समर्पित राज्यकारभार महाराजांनी केला. त्याच धर्तीवर राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी शिवाला अर्थात शंकराला समर्पित असा राज्यकारभार केला. केवळ राज्यातच नव्हे तर संबंध भारतवर्षात अहिल्यादेवींनी स्वतःच्या खाजगी संपत्तीतून मंदिरे, अन्नछत्रे, तलाव, पानवठे आदि समाजाभिमुख व लोकोपयोगी कामे पार पाडल्याचेही बांगर म्हणाले. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या १३ महिलांचा अहिल्यारत्न पुरस्कार देऊन सन्मान




करण्यात आला. यामध्ये संगीता श्रीराम पांडे, आशा नामदेव साबळे, सत्यभामा संतोष मोरे, सुमित्रा राजाभाऊ सोन्नवर, पार्वती हरिदास तपसे, विद्या महादेव रासवे, सुगना सत्यनारायण तेला, इंदुबाई राजाराम अन्नदाते, राणी चंद्रकांत पोपळे, उर्मिला राजाभाऊ काळे, मीनाक्षी देवकते (डोमाळे), सुनिता राजेश कुलथे यांचा समावेश आहे. याच कार्यक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित वक्तृत्व व निबंध स्पर्धेतील यशस्वी स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपाचे शहराध्यक्ष विनायक मामा रत्नपारखी, अभिजीत सोळंके, रूपाली कचरे, प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर , ज्ञानेश्वर सरोदे, मनोज कोरडे, विशाल देवकते, अविनाश कांडुरे आदींनी परिश्रम घेतले.

# राजुरी स्टीलच्या विद्यमाने मी बारावी पास मतदार नोंदणी करणार हमखास उपक्रम

जालना । प्रतिनिधी

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली यावर्षी इयत्ता १२ वीची परिक्षा दिलेल्या ३५ हजार विद्यार्थ्यांच्या मतदार यादीत नाव नोंदणीसाठी 'मी बारावी पास... मतदार नोंदणी हमखास. विशेष उपक्रम जिल्हाधिकारी कार्यालय व राजुरी स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हातील २३४ महाविद्यालयांत राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी व राजुरी स्टील जालनाचे व्यवस्थापकीय संचालक कैलास लोया यांनी संयुक्तपणे दिली. यावर्षी दि. ५ मे २०२५ रोजी बारावी परिक्षेचा निकाल जाहीर झाला असून जिल्हातील २३४ महाविद्यालयातील ३५५१९ विद्यार्थ्यांनी बारावीची परिक्षा दिलेली आहे. निकाल लागल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ही मुले देशाच्या कानाकोपऱ्यात जातात. बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे वय हे १८ वर्षे पूर्ण झालेले असते व हे विद्यार्थी मतदार यादीत नावनोंदणीसाठी पात्र असतात हीच बाब लक्षात घेऊन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी राजुरी स्टील जालना यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम हाती घेतला आहे. १२ उतीर्ण झालेले विद्यार्थी महाविद्यालयात टी. सी. व गुणपत्रिका हस्तगत करण्यासाठी आल्यानंतर संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी संबंधित विद्यार्थ्यांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठीचा नमुना अर्ज क्रमांक ६ भरुन घेण्यात यावा. या अर्जासोबत आधार कार्ड, विद्यार्थ्यांचे गुणपत्रक व टी.सी. सोबत जोडून सदरील अर्ज तहसील कार्यालयात निवडणूक विभागात दि. १० जून २०२५ पर्यंत सादर करावेत. याबाबत जिल्हातील २३४ महाविद्यालयांच्या प्राचार्यांची तालुकानिहाय तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरावर बैठक घेण्यात येणार असून याठिकाणी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांना बॅनर, स्टिकर्स व नमुना अर्ज क्रमांक ६ अर्जाचे वाटप करण्यात येणार आहे. या उपक्रमात जे महाविद्यालय १०० टक्के विद्यार्थांची मतदार यादीत नावनोंदणी करेल अशा महाविद्यालयांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. जिल्हातील २३४ महाविद्यालयातील प्राचार्यांनी व विद्यार्थांनी या उपक्रमास सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालय व राजुरी स्टील जालना यांच्यावतीने करण्यात येत आहे.

# मंठा तालुक्यात प्रथमच होतेय सहकार जागृती चळवळ

**जालना । प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील मंठा तालुक्याच्या इतिहासात प्रथमच सहकार जागृती चळवळीच्या माध्यमातून व सन २०२५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष म्हणून शासनाने जाहीर केले असल्याने सहकारातून समृद्धीकडे या अनुषंगाने सहकार खाते वर्षभर सहकार जागृती चळवळ राबविणार आहे असे मंठा येथील सहाय्यक निबंधक श्रीमती (लेखिका) तुळसा जाधव यांनी सांगितले आहे. मंठा तालुक्यात सहकार विषयक जागृती वाढविणे हा या मागील प्रमुख उद्देश असून सहकारातील घटक पक्षाला त्यांच्या अधिकाराची व कर्तव्याची व्याप्ती माहीत व्हावी या साठी शुक्रवार रोजी मंठा जालना रोड वरील विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालय येथे प्रियदर्शनी सहकारी बँकेचे मुख्य अधिकारी सचिन वाणी यांचे सहकार जागर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. सहकार चळवळ वाढल्याशिवाय समाजाचा एकूण विकास होणार नाही म्हणून शासनाने जाहीर केल्याप्रमाणे सन २०२५ हे वर्ष मंठा तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती, सर्व पतसंस्थांच्यामाध्यमातून सहकार चळवळ राबविणार जाणार आहे. त्याचबरोबर वर्षभरात सहकार जागृती व्याख्यान, वृक्षारोपण कार्यक्रम, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पथनाट्य, रक्तदान शिबिर, सहकार दिंडी स्वच्छता अभियान, सहकार निबंधक व्याख्यान आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले पतसंस्थांच्या माध्यमातून करण्यात आले आहे. त्या मुळे तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी सहकार जागृती कार्यक्रमाचा लाभ घेऊन सहकार चळवळ गतिमान करावी असे आवाहन सहाय्यक निबंधक श्रीमती लेखिका तुळसा जाधव यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### ऑपरेशन सिंदूर इतिहासातील

असलेल्या प्रमुख दहशतवादी तळांनाच नष्ट केले नाही तर युद्धबंदी करार करण्यापूर्वी लष्करी तळांनाही लक्ष्य केले. पंतप्रधान म्हणाले की, भारताच्या सशस्त्र दलांनी दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केल्याने पाकिस्तानला आश्चर्य वाटले. पाकिस्तानात शेकडो किलोमीटर घुसून छावण्या उद्ध्वस्त करण्यात आल्या. ऑपरेशन सिंदूर ही दहशतवादाविरुद्धची भारतीय इतिहासातील सर्वात मोठी आणि यशस्वी कारवाई आहे,'' असे ते म्हणाले. सीमेपलीकडून सर्वाधिक सर्जिकल स्ट्राईक कोणी केले यावरून भाजप आणि काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या वाक्युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींचे हे वक्तव्य आले आहे. भविष्यात जर भारतावर पुन्हा हल्ला झाला तर दहशतवादी आणि त्यांचे पुरस्कर्ता दोघांनाही मोठी किंमत मोजावी लागेल, असा पुनरुच्चार पंतप्रधानांनी केला. ''ऑपरेशन सिंदूरने स्पष्टपणे जाहीर केले आहे की दहशतवादाद्वारे प्रॉक्सी युद्ध यापुढे सहन केले जाणार नाही. आता, आम्ही त्यांच्या घरांमध्येही हल्ला करू (घर में घुस के मारेंगे). दहशतवाद्यांना मदत करणारा कोणीही त्याची मोठी किंमत मोजेल,'' असे पंतप्रधान मोदींनी जाहीर केले. असिस्टंट कमांडंट नेहा भंडारी यांच्या नेतृत्वाखालील महिला बीएसएफ पथकाने तीन दिवस अखनूरमधील त्यांच्या पुढच्या चौक्यांचे रक्षण कसे केले हे पंतप्रधानांनी अधोरेखित केले.

-------------

### डोनाल्ड ट्रम्प याच्या वक्तव्यावर

संभाव्य अणु आपत्ती टाळल्याचा ट्रम्प यांनी केलेला दावा पुन्हा एकदा पुन्हा सांगितल्यानंतर काँग्रेसचे जयराम रमेश यांनी हा हल्ला केला. जयराम रमेश यांनी एक्सवरील एका पोस्टमध्ये म्हणाले की, डोनाल्ड ट्रम्प यांनी २० दिवसांत ३ देशांमध्ये नवव्यांदा केलेल्या दाव्यांमुळे भारत आणि पाकिस्तानची समानता पुन्हा एकदा दिसून येते. भारत नेहमीच ''डी-हायफनेशन'' वर आग्रही राहिला आहे. ''भारत-पाक'' या शब्दाचा संदर्भ आहे, जो ९० च्या दशकात पश्चिमेकडील देशांनी दक्षिण आशियाला अशाच प्रकारे पाहिले होते जेणेकरून दोन्ही राष्ट्रांशी त्यांचे संबंध संतुलित करता येतील. ३ देश आणि ३ शहरांमध्ये २० दिवसांत ही त्यांची ११ वी वेळ आहे. डोनाल्डभाई यांनी ४ दिवसांचे भारत-पाकिस्तान युद्ध कसे थांबवले. अमेरिकेचा हस्तक्षेप आणि अणुयुद्ध थांबवण्यासाठी व्यापारी साधनाचा वापर यासारख्याच घटनांचा क्रम पुन्हा पुन्हा सांगत आहेत. असा सवाल रमेश यांनी ट्विट मधून केला आहे. सरकारने नेहमीच असे म्हटले आहे की नवी दिल्ली आणि इस्लामाबादने युद्धबंदीसाठी ''थेट वाटाघाटी'' केल्या आणि त्यात अमेरिकेची कोणतीही भूमिका नव्हती. दुसरीकडे अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी अलिकडेच न्यायालयासमोर उल्लेख केला की शुल्काच्या धमकीमुळे अमेरिकेला भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीमध्ये मध्यस्थी करण्यास मदत झाली. याबाबत मोदी यांनी मौन सोडावे अशी मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

---------

### विदर्भात जोरदार पावसाचा अंदाज;

मान्सूनची अरबी समुद्रातील शाखा मागील ५ दिवसांपासून तर बंगालच्या उपसागरातील शाखा मागील ३ दिवसांपासून एकाच भागात होती. मान्सूनची सिमा मुंबई, अहिल्यानगर, आदीलाबाद, भवानीपटना, पुरी आणि बालूरघाट भागात होती. राज्यातील अनेक भागात पुढील ५ दिवस हलक्या ते मध्यम पावसाची शक्यताही वर्तविण्यात आली आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड आणि हिंगोली जिल्ह्यात पुढील ५ दिवस काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज आहे. विदर्भातील अकोला, चंद्रपूर, वाशीम आणि बुलडाणा जिल्ह्यात मंगळवार आणि बुधवारी काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. पुढील ३ दिवस पावसाची उघडीप राहण्याची शक्यता आहे. अमरावती, वर्धा, नागपूर, गोंदीया, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यात पुढील ५ दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता आहे. नागपूर जिल्ह्यात आज तसेच सोमवारी आणि मंगळवारी पावसाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहिल्यानगर जिल्ह्यातही काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा पुढील ५ दिवस अंदाज आहे. पावसाचा जोर कमीच राहणार आहे. कोकणातील सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात पुढील ३ दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र रायगड, पालघर, मुंबई आणि ठाणे जिल्ह्यात पुढील ५ दिवस हलक्या सरी काही ठिकाणी पडतील, असा अंदाज हवामानविभागाने दिला.

--------

### स्थानिक स्वराज्य संस्था

असल्याने या निवडणुका दोन टप्प्यांत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या निवडणुका ऑक्टोबरमध्ये होण्याचे संकेत मिळत आहेत.

----------

### योगी आदित्यनाथ देशातील सर्वात

उच्च न्यायालयात ६८० कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या नवनिर्मित अधिवक्ता चेंबर इमारती व मल्टीलेव्हल पार्किंगच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सरन्यायाधीश म्हणाले, योगीजी हे देशातील सर्वात शक्तिशाली मुख्यमंत्री आहेत, असे केंद्रीय कायदामंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी म्हटलं आणि मी हे देखील म्हणतो की अलाहाबाद ही शक्तिशाली व्यक्तींची भूमी आहे. बी. आर. गवई यांनी भारतीय संविधानाचे ७५ वर्षांचे महत्त्व अधोरेखित करताना म्हटले की, जेव्हा जेव्हा भारतावर संकट आले, तेव्हा संविधानाच्या जोरावर देश एकजूट आणि मजबूत राहिला. न्यायपालिका, कार्यपालिका आणि संसद या तीनही स्तंभांनी सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. संपत्तीचे पुनर्वाटप करणारे अनेक कायदे आणले गेले, जमींदारांकडून जमीन घेऊन भूमिहीनांना देण्यात आली. गवई यांनी १९७३ च्या ऐतिहासिक १३ न्यायाधीशांच्या घटनात्मक खंडपीठाच्या निर्णयाचा उल्लेख करत म्हटले की, मुलभूत हक्क आणि नीति निर्देशक तत्वे ही संविधानाच्या आत्म्याची दोन चाके आहेत. यातील एखादं चाक थांबलं, तर संविधानाचा रथच थांबेल.

--------------

### सुप्रिया सुळे परदेशातून आल्यानंतर

आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एका कार्यक्रमात एकाच मंचावर एकत्र दिसले होते. त्यानंतर दोन्ही गट एकत्र येतील, अशा स्वरूपाचे दावे आणि प्रतिदावे काही नेत्यांकडून करण्यात आले. आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या चर्चेवर सूचक वक्तव्य केले आहे. रोहित पवार म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येणार का? जसा प्रश्न तुम्हाला पडला आहे तसाच अनेकांना पडला आहे. मात्र, आजपर्यंत फक्त ही चर्चा आहे. वरिष्ठ पातळीवर सर्व आमदारांना घेऊन सुप्रियाताई, शरद पवार, जयंत पाटील यांनी आम्हाला कुठेही काही सांगितले नाही. जर आम्हाला काही कळाले तर आम्ही समोरून नक्की येऊन सांगू. मी सरकारवर सगळ्यात जास्त टीका केली आहे. पवार साहेब म्हणत असतील मला काही माहित नाही तर मी म्हणेन मला यातील काही समजत नाही. सुप्रियाताई यावर जोपर्यंत बोलत नाहीत, तोपर्यंत काही होणार नाही. पवार साहेबांच्या मनात काय आहे? हे कळत नाही. पवार साहेबांनी केलेल्या वक्तव्यावर बऱ्याच काही चर्चा झाल्या. पुढच्या पिढीची जबाबदारी सुप्रियाताई यांच्यावर दिली आहे. त्यामुळे सुप्रियाताई काय भूमिका घेणार? हे बघावे लागेल. त्या सध्या परदेशात आहेत. परदेशातून आल्यावर सविस्तर भूमिका स्पष्ट करतील, असे त्यांनी म्हटले.

----------

### अंबाजोगाईच्या स्वामी विवेकानंद

प्रभाकर, प्रभाकर नरबा आरसुडे, महादेव मुकुंदराव मुंडे, कर्मचारी शिवहर महादेव अप्पा आकुसकर यांच्या सह १५ जणांवर अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात शासकीय लेखापरीक्षण सतिश पोकळे यांनी गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे पंधरा पैकी दहा जण हे अंबाजोगाई डीसीसी बँकेतील कर्मचारी आहेत. यामध्ये एस.एस. लांडगे (अकॉउंट), यु.डी. देशमुख (इन्स्पेक्टर), ए.एस. पवार (लिपीक), एम.एस. सावरे (लिपीक), एम. आर. कदम (लिपीक), बी. एस. बांगर (सिनियर इन्स्पेक्टर), के. एम. केकान (लिपीक), यु.एस. नागरगोजे (लिपीक), एस.आर. खाडे (एजंट) आणि ए.एन. वाभळे (लिपीक) याचा समावेश आहे. आयपीसी ४०६, ४०९ आणि ३४ भादविनुसार हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घोटाळ्याचा मुख्य सुत्रधार सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेचा संस्थापक अध्यक्ष कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल असून स्वामी विवेकानंद शिक्षक सहकारी पतसंस्थेत २ कोटी २९ लाख ७१७ रूपयांचा घोटाळा करून कुरेशी मुजीब अहेमद अब्दुल रहिम याने सानेगुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्था स्थापन केल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, आतापर्यंत स्वामी विवेकानंद पंतसंस्थेमधील आठ कोटीहून अधिकचा घोटाळा उघडकीस आल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

---------

### भाजपच्या जिल्हाध्यक्षपदी शंकर

जात आहे. यासंदर्भात दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानी एक महत्त्वाची बैठक झाली होती. या बैठकीत भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस अशोक सिंह, सह-संघटनमंत्री शिवप्रकाश आणि महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उपस्थित राहून जिल्हाध्यक्ष निवडीसंबंधी चर्चा केली होती. यानंतर आता भाजपकडून उर्वरित २२ जिल्हाध्यक्षांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. यात नाशिक, नगर, बीडसह प्रमुख जिल्हाध्यक्षांची नावे जाहीर करण्यात आली आहे. बीड जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख यांची वर्णी लागली असून पालघर - भरत राजपूत, वसई विरार - प्रज्ञा पाटील, अहिल्यानगर शहर - अनिल मोहिते, नाशिक शहर - सुनील केदार, नाशिक दक्षिण - सुनील बच्छाव, नाशिक उत्तर - यतीन कदम, पुणे दक्षिण (बारामती) - शेखर वढणे, कोल्हापूर शहर - विजय जाधव, गडचिरोली - रमेश बारसागडे, चंद्रपुर शहर - सुभाष कासमगुट्टवार, चंद्रपूर ग्रामीण - हरिष शर्मा, वर्धा - संजय गाते, परभणी ग्रामीण - सुरेश भुबरे, छत्रपती सांभाजीनगर शहर - किशोर शितोळे, लातूर शहर - अजित पाटील कव्हेकर, लातूर ग्रामीण - बसवराज पाटील, नांदेड उत्तर - ॲड. किशोर देशमुख, नांदेड दक्षिण - संतुकराव हंबर्डे यांच्या नावाचा समावेश आहे.

----------------------

### लोकनेत्याच्या स्मृतीदिनाची गोपीनाथगडावर

वृक्षांच्या रोपांचे वाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

**ढोक महाराजांचे सुश्राव्य कीर्तन**

सामाजिक उपक्रमा बरोबरच ३ जूनला दुपारी १२ ते २ वा. यावेळेत प्रसिद्ध कीर्तनकार रामायणाचार्य ह.भ.प रामराव महाराज ढोक यांचे सुश्राव्य कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. पावसाची शक्यता लक्षात घेऊन १२०२०० आकाराचा वॉटरप्रूफ मंडप आणि सामाजिक उपक्रमांसाठी स्टॉल्स आणि कक्ष उभारणीचे काम सध्या गतीने सुरु आहे. तर गडावर येणाऱ्या मुंडे भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची आणि महाप्रसादाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

---------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ०१ जून २०२५


## राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



जालना । प्रतिनिधी

जालना जिल्हा मध्यवर्ती सह. बँक, जालना च्या संतोषी माता शाखेच्या वतिने ज्ञानेश्वर टेकाळे यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रीय सेवारत्न पुरस्कार प्राप्त झाल्या बद्दल राष्ट्रवादी शिक्षक संघाचे वि. उपाध्यक्ष ज्ञानेश्वर टेकाळे यांचा सत्कार संतोषी माता शाखेचे शाखाधिकारी सदाशिव कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आला या प्रसंगी बँकेचे किशोर खिल्लारे , सचिन कोलते, अविनाश टापरे, सचिन अंबेकर, पंकज फुके, संदीप भिंगारे, इंजिनिअर शाम जाधव, उमेश आस्कंद, मुकुंद पाखरे, सुशिल क्षिरसागर आदीची उपस्थिती होती.

# दिवाळीपासून निराधार मानधनापासून वंचित

## चौकशीसाठी रोज तहसीलमध्ये चकरा,तहसीलदारांचे दुर्लक्ष

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**शासनाकडून संजय गांधी निराधार, विधवा, अपंग या लाभार्थीसाठी दर महिन्याला मानधन दिले जाते; परंतु अंबाजोगाई तालुक्यातील अनेक गावांतील लाभार्थीना दिवाळी पासून मानधन मिळाले नाही. त्यामुळे या लाभार्थीची उपासमार होत असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे, हे लाभार्थी रोज तहसील कार्यालयात चौकशीसाठी खेट्या मारतात. मात्र, त्यांना कोणीच दाद देत नसल्यामुळे लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. निराधारांच्या समस्येकडे तहसीलदार विलास तरंगे यांचे साफ दुर्लक्ष होत असल्याचे आरोप निराधार करीत आहेत.**



संजय गांधी निराधार, विधवा, अपंग, वृद्ध यांच्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून दर महिन्याला मानधन मिळते. शासनाकडून काही महिन्यांपासून आता या लाभार्थीच्या थेट खात्यावर डीबीटीद्वारे मानधन जमा होत आहे; परंतु या ऑनलाइन पद्धतीमुळे गेल्या अनेक वर्षांपासून मानधन सुरू असलेले संजय गांधी निराधार, विधवा, दिव्यांग असे शेकडो लाभार्थी गेल्या आठ महिन्यांपासून मानधनापासून वंचित असल्याचे उघडकीस आले आहे. यामुळे त्यांची उपासमार होत आहे. अनेक वृद्ध, महिला, पुरुष यांना कुटुंबांनी नाकारले असल्यामुळे त्यांचा उदरनिर्वाह शासनाच्याच मिळणाऱ्या या मानधनावर चालतो; परंतु गेल्या आठ महिन्यांपासून हे लाभार्थी दररोज बँकेत जाऊन आले का साहेब आमचे मानधन असे विचारतात. मात्र, त्यांना नाही असे उत्तर मिळताच ते हिरमुसले जात असल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे या लाभार्थीनी हयात प्रमाणपत्र, आधार कार्ड बँकेशी जोडणी, केवायसीसुद्धा केलेली असताना मानधन जमा का होत नाही, याबाबत शंका निर्माण झाली. याबाबत तहसील कार्यालयात संजय गांधी विभागात चौकशी करण्यासाठी गेल्यास प्रत्येक वेळी नवीन कागदपत्र जमा करण्याचे सांगितले जात असल्याच्या लाभार्थीच्या तक्रारी आहेत. लाभार्थ्यांना त्वरीत मानधन मिळाले नाही तर आंदोलन करण्याचा इशारा सामाजीक कार्यकर्ते दिपक शिंदे, खतीब बाबा, सुनंदा लोखंडे यांनी दिला आहे.

### महिलांना आश्रु अनावर

अनेक महिला वयोवृध्द, विधवा व निराधार महिला आपले मानधन बंद असल्याने तहसील कार्यालयात आल्या होत्या. मागील आठ महिन्यापासून मानधन बंद असल्याने आजारासाठी लागणाऱ्या औषध-गोळ्या कश्या घ्याव्यात असे सांगतांना महिलांना आश्रू अनावर झाले होते.

माझ्या मुलाचे एक वर्षापुर्वी तर मालकाचे २२ वर्षापुर्वी निधन झाले आहे. आठ महिन्यापासून पगार बंद असल्यामुळे माझ्यासमोर खाण्या-पिण्याचे वांदे निर्माण झाले आहे. आमच्या मानधनाकडके तहसीलदार लक्ष देत नाहीत. मी सात वेळा मानधना बाबत चौकशी करण्यासाठी आली आहे, तरी मानधन सुरु झाले नाही. आवर्षणा गडदे (लाभार्थी,राक्षसवाडी)

## जय जवान माध्यमिक विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी

**वडवणी । प्रतिनिधी**

आज दि.३१ मे २०२५ वार शनिवार रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव येथे धर्मनिरपेक्षता, स्वातंत्र्य, बंधुता, समता व न्याय या तत्त्वां प्रमाणे राज्यकारभार करणाऱ्या पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त त्यांच्या पावन प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार , पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. सदरील कार्यक्रमास अरुणा असफली महिला मंडळ





संस्थेचे मा. अध्यक्षा,सचिव, पदाधिकारी, मा.सरपंच, उपसरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, ज्येष्ठ नागरिक, शिक्षण प्रेमी, पालक वृंद माजी विद्यार्थी मंडळ व विद्यालयातील प्राचार्य, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद सर्व उपस्थित होते. तसेच मान्यवरांनी उपस्थित सर्व विद्यार्थी व ग्रामस्थ यांना जयंती निमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच सदरील कार्यक्रमाच्या प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.सारोक्ते डी जी सर यांनी केले अहिल्याबाई यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी झाला. त्या एक सामान्य कुटुंबात जन्मलेल्या होत्या, पण त्यांच्यात एक असामान्य नेतृत्व क्षमता आणि प्रशासकीय कौशल्ये होती. त्यांनी आपल्या पतीच्या मृत्यूनंतर राज्यकारभार सांभाळला आणि आपल्या धैर्याने आणि दूरदृष्टीने होळकर राजघराण्याचे नाव उज्ज्वल केले.

## युवराज मुरकुटे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम





**कळंब । प्रतिनिधी**

भारतीय जीवन विमा शाखा कळंब चे शाखा प्रबंधक भारत चोरघडे यांनी सांगितले की कळंब च्या शाखेतील सतत कार्यरत असणारे विकास अधिकारी युवराज मुरकुटे आज निवृत्त होत आहेत.

त्यांच्या कामाचा आदर्श घेऊन आपण पुढे चालणार आहोत . शाखेतील कोणाला ही सहकार्य सहज करत होते . त्यांचे मूळ गाव फक्राबाद तालुका वाशी, जिल्हा धाराशिव या छोट्याशा गावात २७ मे १९६५ जन्मलेले , वडील शेतकरी .शिक्षण एम.ए पर्यंत घेऊन . २७ मे१९८९ रोजी भारतीय जीवन विमा मध्ये रूजू झाले . ३६ वर्ष अत्यंत प्रमाणिक पणे सेवा दिली . एल आय सी एजन्ट च्या मार्फत सत्कार करण्यात आला. बक्सी चंद्रशेखर , उषा केंद्रे , अनिल जाधवर , दत्ता काळे, अविनाश लांडगे,दिंगाबर शेळके , हरी कोठावळे, दादाहरी मोराळे, शिवाजी कुंभार, विजयसिंह मोहिते आदी उपस्थित होते.

## अवकाळी पावसाचा अंबा विक्रीवर परिणाम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बऱ्याच दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसाचा फटका शहर व परिसरातील अंबा पिकाला बसला असून तयार होण्याच्या मार्गावर आणि पिकलेला अंबा अवकाळी पावसामुळे खराब होत आहे तर वादळामुळे बऱ्याच ठिकाणी अंबे गळून पडले आहेत.



यंदा केशर, तोतापुरी, काही प्रमाणात असलेला गावरान अंबा बाजारात यायला उशीर झाला आहे. त्याचा परिणाम अंबा विक्रीवर होत असल्याचे दिसून येत आहे. अंबाजोगाई शहर व परिसरात क्षेत्रावर आंब्याची लागवड मोठ्या प्रमाणात आहे. हजारांवर शेतकरी अंबा उत्पादक आहेत. दरवर्षी अंबा विक्रीतून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होते. यंदा एकदम सुरुवातीला अंब्यासाठी पोषक वातावरण होते. अंब्याच्या झाडाला मोहर येऊन कैऱ्या तयार होण्याची

प्रक्रिया सुरू होती. परंतु, काही ठिकाणी तुडतुड्या रोगाचा अंब्यावर प्रादुर्भाव झाला व लगेच अवकाळी पाऊस सुरू झाला. त्यामुळे बाजारात येणारा अंबा उशिरा दाखल झाला

गतवर्षीच्या तुलनेत यंदा अधिक प्रमाणात उत्पादनावर परिणाम होण्याची भीती अंबा उत्पादक शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. प्रामुख्याने उन्हाळा सुरू होताच खवय्यांना कमी/ अधिक दराने अंबा खरेदी करायला मिळतो.

परंतु, यावर्षी हापूस आंब्याचे दर चढ्या स्वरूपात आहेत.

बाजारात केशर अंबा खवय्यांना आकारानुसार किंमत मोजावी लागत आहे. यंदा अंबा उत्पादनावर अवकाळी पावसाचा फटका बसला आहे. बाजारात केशर आंबा उशिरा दाखल झाला आहे. त्यामुळे अंब्याचे दर वाढल्याचे लक्षात येतआहेत. परिणामी अवकाळी पावसाचा अंबा विक्रीवर अधिक परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांचा भाजपात प्रवेश

**अंबड । प्रतिनिधी**

अंबड बदनापूर मतदारसंघाचे आमदार तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांचे नेतृत्व स्वीकारून त्यांच्या उपस्थितीत अंबडचे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाचे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला आहे.



दरम्यान प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये अंबडनगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे, बाबासाहेब कटारे, चंद्रकांत लाड, नारायण वाघमारे, विष्णू धुळे, रामेश्वर कटारे, हारी भाऊ पिराने, गणेश पिराने, मंगेश भिसे, प्रदीप गरड, अंकुश गाडेकर, अरुण खरात, अखिल भाई, आदिल भाई, व्यंकटेश कटारे, वैजनाथ चव्हाण, बंडू काळबांडे, विजय राजपूत,यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) गटाला राम राम करून सोडचिठ्ठी देत आ.नारायण कुचे यांच्या उपस्थितीत अंबड येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात जाहीर प्रवेश केला आहे. यावेळी मा. नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांना विचारले असता प्रवेश का केला ते म्हणाले की माझी वैयक्तिक कारणामुळे मी भाजपमध्ये प्रवेश करीत आहे आज पर्यंत राजकारणामध्ये कोणत्याही लोकप्रतिनिधीवर मी नाराज नसून सखुशीने मी भाजप पक्षात प्रवेश करीत आहे असे माजी नगराध्यक्ष काकासाहेब कटारे यांनी बोलताना सांगितले. प्रवेश दरम्यान यावेळी दीपकसिंह ठाकूर, देविदास कुचे, प्रदीप पवार, फेरोज शेख, कृष्णा पाटील जिगे, सुरेश गुडे, संदीप खरात, विठ्ठल राणा, डॉ. नंदकिशोर पिंगळे, बाळू उर्फ शाहुल खरात, अंबादास जाधव, संजय जाधव, पांडुरंग शिंदे, संजय राठोड, गंगाधर वराडे, बळीराम राऊत, नसिर बागवान यांच्यासह भाजपाचे अनेक प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मोठेवाडीत अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन





माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सुभद्रा अंगद खेत्री ह्या होत्या तर ग्रामविकास अधिकारी बिभीषण डोरले,ग्रां.पं.सदस्य जगन्नाथ खेत्री, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष राहुल सुरवसे,ॲड. पांडुरंग गोंडे, प्रा.डॉ.नितीन जाधव,गणेश सर्जे, प्रकाश शेळके, गणेश पास्टे, संजय रोकडे, अंगणवाडीताई पंचफुला पाष्टे,शकुंतला गिराम,शिवकन्या खेत्री, शारदा खेत्री, अनुसया पवार,आशाबाई चव्हाण,मुक्ता पास्टे, संगीता अलाट, अंकीता खेत्री यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या तालुका अध्यक्षांची घोषणा



**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी बीड जिल्ह्यातील सर्व अकरा तालुका अध्यक्षांच्या नावांची घोषणा आज जाहीर केली.जिल्ह्याचे लोकप्रिय खा. बजरंग बाप्पा सोनवणे,आ. संदिप क्षीरसागर, माजी आमदार, जेष्ठ नेते मंडळी यांचेशी चर्चा करून निवडी करण्यात आल्या असल्याची माहिती जिल्हध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे.**

राजेंद्र मस्के यांची जिल्हाध्यक्ष पदावर निवड झाल्यानंतर सर्व नेते पदाधिकारी कार्यकर्ते यांचेशी चर्चा करून राष्ट्रवादी भवन बीड येथे जिल्ह्याची व्यापक बैठक घेऊन जुनी कार्यकारिणी बरखास्तीची घोषणा केली होती. त्यानंतर जुन्या नव्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन तालुका निहाय बैठका घेण्यात आल्या. प्रत्येकांशी संवाद साधण्यत आला.तालुका अध्यक्ष कसा असावा कोण असावा याबाबत अनेकांचे मत विचारात घेण्यात आले. पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सोबत घेऊन नवीन माणसं जोडणारा असावा. तालुक्यातील जनता व कार्यकर्त्यांना वेळ देणारा, सर्वांना सोबत घेऊन तालुकाभरात काम करणारा व्यक्तीची निवड करावी.अशी प्रतिक्रिया सामान्य कार्यकर्त्यां मधून आल्या नंतर पुढील तालुका अध्यक्ष नावांची निश्चिती करण्यात आली. राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार साहेब याचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्या साठी, सामान्य जनते सेवा आणि अन्याय अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवण्यासाठी सर्वांना सोबत घेऊन ताकदीने काम करावे. अशी अपेक्षा व्यक्त करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

नवनियुक्त तालुका अध्यक्षांची नावे पुढीलप्रमाणे....

गेवराई- अण्णासाहेब राठोड, बीड -राहुल अर्जुनराव गोरे परळी- बाबासाहेब शंकरराव शिंदे केज- शंकर जाधव, माजलगाव- विश्वंभर जनार्दन थावरे धारूर -युवराज आनंदराव लगड वडवणी - महादेवराव जमाले अंबाजोगाई -अमर देशमुखशिरूर- दिपक खोले पाटोदा- आनंद जाधव आष्टी- सुनील नाथ

पान ६ वरून...

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी

श्रीफळ, देऊन स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच आरोग्य सेवेमध्ये कार्यरत असणाऱ्या आशा सेविका यांचाही यावेळी अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मान करण्यात आला. तसेच गावामध्ये अनेक महिला बचत गटाच्या माध्यमातून काम करत आहेत त्यांचाही ग्रामपंचायत पिंपळवाडी च्या वतीने अहिल्यादेवी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. नुकत्याच अंगणवाडी मदतनीस म्हणून निवड झालेल्या महिलांचाही यावेळी सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला ग्रामपंचायत पिंपळवाडी चे सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह गावातील महिला,तरुण मंडळ तसेच अहिल्यादेवी सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य हजर होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा.बाळासाहेब कळसाने यांनी केले तर आभार प्रदर्शन शंकर तुपे यांनी केले.

### समाजप्रबोधनासाठी

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ ध्यानसाधक व सामाजिक कार्यकर्ते उत्तम कांबळे तर प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, प्रा.माधव रोडे, प्रा.डॉ.विनोद जगतकर, प्रा.डॉ.सिद्धार्थ तायडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमात मनोगत व्यक्त करीत असताना आयोजक सचिन कागदे यांनी समाजामध्ये विविध क्षेत्रात कार्यरत असणारे आणि समाजप्रबोधनाचे महान कार्य हाती घेतलेले, वंचित उपेक्षितांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी लढणाऱ्या लढवय्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणा देण्यासाठी, त्यांचे कौतुक करण्यासाठी हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आल्याचे सांगितले. या सत्काराला उत्तर देत असताना सुप्रसिद्ध मानसोपचार व व्यसनमुक्ती तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी हे पुरस्कार कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांना नवीन ऊर्जा देत असतात आणि यामुळे ते पुढील कार्य करण्यासाठी प्रेरित होतात. स्मृतीशेष ईश्वरजी कागदे हे एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते होते विषमतेच्या अनेक लढाया त्यांनी लढल्या आणि समाजासाठी शेवटपर्यंत ते झुंजत राहिले. त्यांच्या या कार्याला त्यांच्या मरणोत्तर जीवंत ठेवण्यासाठी पप्पूजी कागदे, सचिनजी कागदे या त्यांच्या पुत्रांनी हा पुरस्कार सोहळा त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी ठेवला आहे. हे एखाद्या माणसाच्या कार्याला अजरामर कसे करायचे याचे उत्तम उदाहरण आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. मला अनेक पुरस्कार मिळाले. पण, समाजाने दिलेला हा पुरस्कार माझ्यासाठी सर्वोच्च आहे. माझे वडील उपप्राचार्य प्रा.मधुकरराव इंगोले व आई प्राचार्य डॉ.विजयाताई इंगोले यांचा स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्याशी फार जवळचा ऋणानुबंध होता. त्यामुळे अनेक वेळा ते परळी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त समाजप्रबोधनाच्या कार्यक्रमासाठी आवर्जून येत असत. आई-वडिलांच्या या सामाजिक प्रबोधनातील चळवळीचा वारसा इथून पुढे मी त्याच ताकदीने चालवेल हा शब्द या कार्यक्रमात देत आहे व कागदे परिवाराच्या या समाज प्रबोधनाच्या चळवळीत आम्ही कायम त्यांच्या सोबत राहू असा शब्द डॉ.राजेश इंगोले यांनी दिला. यावेळी डॉ राजेश इंगोले यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्य यावर प्रकाशझोत टाकत या कार्याचे सद्यस्थितीतील महत्त्व आणि समाजातील शिक्षित प्रगत घटकांची समाजाप्रती असलेली जबाबदारी यावर भाष्य केले. सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या लढ्याचा लेखा जोखा अत्यंत नेमक्या आणि प्रभावशाली भाषेत व्यक्त करीत नामांतराच्या लढ्याचा इतिहास उलगडून सांगितला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करीत असताना अध्यक्ष उत्तम कांबळे यांनी बौद्ध धम्मातील ध्यान साधना ही समाजातील प्रत्येक घटकांसाठी आवश्यक बाब आहे. यामुळे मनातील विकारांवर ताबा मिळविण्यासाठी मदत होते. त्यामुळे प्रत्येकाने जीवनात एक वेळा तरी ध्यान साधना शिबिर करणे गरजेचे आहे. असे सांगत ज्यांना कुणालाही या शिबिरांमध्ये सहभागी व्हावयाचे आहे त्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. प्रा.मधुकरराव इंगोले व प्राचार्य डॉ.विजयाताई इंगोले यांचा सामाजिक सेवेचा वारसा डॉ.राजेश इंगोले यांच्या रूपात अश्ववेगाने पुढे दौडत आहे याचा अभिमान मला आहे. असे सांगत डॉ.राजेश इंगोले यांच्याकडून समाजाच्या खूप अपेक्षा आहेत आणि त्यांच्या या सामाजिक लढ्यात समाज त्यांच्या मागे पूर्ण ताकदीने उभा राहील असे स्पष्ट केले. यावेळी स्मृतिशेष ईश्वरजी कागदे समाजभूषण पुरस्कार संजय जाधव, चेतन चोपडे, प्रा.डॉ.सुजाता धन्वे, प्रा.डॉ.विक्रम धन्वे, प्रा.डॉ.सचिन भुंबे, राम दादा किरवले, डॉ.धम्मपाल घुमरे, भैय्या आदोडे, पत्रकार रानबा गायकवाड, प्रा.डॉ.अनिल नरसिंगे, प्रा.डॉ.किरण चक्रे यांना ही देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड.दिलीप उजगरे यांनी केले. तर बहारदार सूत्रसंचालन बा.सो.कांबळे यांनी केले. उपस्थितांचे आभार सचिन कागदे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परळी शहरातील व कागदे परिवारावर प्रेम करणाऱ्या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

### अनिल जाधवर एक

व मंत्रालय पातळीवर शिक्षक व कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्याचे त्यांचे कार्य प्रशंसनीय असून ते एक प्रकारचे शिक्षकांसाठी दिपस्तंभाचे कार्य करतात असे विधान प्रमुख पाहुणे म्हणून बोलतांना प्राचार्य डॉ.विक्रम सारुक यांनी केले.सेवाकालावधीमध्ये जाधवर यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्यामुळे त्यांना विविध पुरस्कार मिळाले. त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा परिषद बीडचा आदर्श शिक्षक पुरस्कार, मुलींची उत्कृष्ट पटनोंदणी जि.प.पुरस्कार, उत्कृष्ट कर्मचारी जनगणना कार्य भारत सरकारचा पुरस्कार याशिवाय अनेक पुरस्कार मिळाले.त्यामुळे त्यांच्या कार्याची व सेवेची दखल घेऊन कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ व केंद्रिय शाळा अशोकनगर यांच्या संयुक्त विद्यामाने सेवापूर्ती गौरव सोहळयाचे आयोजन केले. केंद्रप्रमुख हकीम मनियार, केंद्रीय मुख्याध्यापिका कमलताई लांडगे यांनी सत्कार आयोजनामध्ये सहकार्य केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाऊसाहेब हंगे यांनी केले सुत्रसंचालन प्रसिध्द सुत्रसंचालक महादेव इनकर यांनी केले. विशेषत: कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वीततेसाठी परिश्रम घेतले. स्वागतगित व गितगायन सिने पार्श्वगायिका मिनाक्षीताई होळकर यांनी केले. सिने प्रोडयूसर अनिलकुमार होळकर यांनी समयोचित काव्य सादर केले. या कार्यक्रमास शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, राजकीयनेते,डॉक्टर,वकील, पत्रकार बांधव, चुंब गावचे प्रतिष्ठित नागरीक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठया संख्येने उपस्थित होते. समन्वयकाची भूमिका प्रकाश अहिरे व भगिरथ मस्के यांनी पार पाडली व सोमनाथ तांदळे, संजय दराडे, मच्छिंद्र राख, द.ल.वारे, बाळासाहेब सिरसाट यांनी मोलाचे सहकार्य केले तर आभार रविंद्र सुतार यांनी मानले.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे

प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना,प्रा. अंकुश साबळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती हती.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मुकुंद देवर्षी मनोगतात म्हणाले की, सनातन हिंदू संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी त्यांनी हजारो घाट,आणि मंदीरांचा जीर्णोद्धार केला.कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा सिद्धेश्वर संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी यांनी अध्यक्षीय समारोपात म्हटले की,किमान एक गुण आपण पुण्यश्लोक अहिल्यादेवींचा अंगिकारावा म्हणजे देशाचे भविष्य उज्वल होईल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी केले कार्यक्रमाची सांगता शांतीमंत्राने उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी केली.

राज्य लोकतंत्र शेत-शिवार
रविवार, दि. १ जुन २०२५
४

# गव्हाची साठेबाजी, काळाबाजार रोखण्यासाठी सरकारचे कडक धोरण

## नवीन आदेश लागू, किती असणार मर्यादा?

पुणे : देशात अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी केंद्र सरकारने कडक धोरण अवलंबण्याचे निश्चित केले आहे. सरकारने गव्हाच्या साठवणुकीची मर्यादा लागू केली आहे. हा आदेश २७ मे २०२५ पासून लागू झाला आहे. भारतातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ३१ मार्च २०२६ पर्यंत लागू राहील. त्याचा उद्देश गव्हाची कृत्रिम टंचाई रोखणे आणि बाजारात त्याची उपलब्धता नियंत्रित करणे हा आहे.

यामध्ये व्यापारी/घाऊक विक्रेते यांनी जास्तीत जास्त ३००० मेट्रिक टन तर किरकोळ विक्रेते यांनी प्रत्येक किरकोळ दुकानात जास्तीत जास्त १० मेट्रिक टन ठेवता येणार आहे. याशिवाय मोठे साखळी किरकोळ विक्रेते यांना प्रत्येक दुकानासाठी १० मेट्रिक टन आणि त्यांच्या सर्व दुकाने आणि डेपोसह एकूण जास्तीत जास्त (१० एकूण दुकानांची संख्या) मेट्रिक टन गहू साठवता येतो. जे प्रक्रिया करणारे आहेत, त्यांच्यासाठी गव्हाची साठवणूक मर्यादा त्यांच्या मासिक स्थापित क्षमतेच्या ७० टक्के ही उर्वरित महिन्याच्या



(३१ मार्च २०२६ पर्यंत) समान असेल. सर्व साठवणूक संस्थांना दर शुक्रवारी त्यांच्या साठवणुकीची स्थिती अपडेट करावी लागेल, नोंदणी न करणाऱ्या किंवा निर्धारित मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही संस्थेवर जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ६ आणि ७ अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार आहे.

अतिरिक्त साठा कमी करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी

कोणत्याही संस्थेकडे निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त साठा असेल तर त्यांना १५ दिवसांच्या आत तो निर्धारित मर्यादेपर्यंत कमी करावा लागेल. केंद्र आणि राज्य सरकारचे अधिकारी या नियमाचे पालन करण्यावर कडक लक्ष ठेवतील. ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, केंद्र सरकारने आतापर्यंत एफसीआय आणि राज्य संस्थांद्वारे (२७ मे २०२५पर्यंत) २९८.१७ लाख मेट्रिक टन गहू खरेदी केला आहे. जो पीडीएस, ओपन मार्केट सेल स्कीम (ओडब्ल्यूएस) आणि इतर सरकारी योजनांसाठी पुरेसा आहे. अन्न आणि सार्वजनिक वितरण विभाग गव्हाच्या साठ्याच्या स्थितीवर सतत लक्ष ठेवत आहे जेणेकरून किंमती नियंत्रित करता येतील आणि सहज उपलब्धता सुनिश्चित होईल. दरम्यान, सरकारनं सांगितलेल्या नियमांचे पालन नाही केले तर कारवाई करणार असल्याचा इशारा देखील देण्यात आला आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे.

# तुळशीच्या शेतीतून तीन महिन्यातच मिळते जोरदार कमाई

'तुळस' ही अत्यंत पवित्र मानली जाते. भारतात तुळशीला धार्मिक महत्व तर आहेच पण तुळस सामान्यतः डोकेदुखीपासून कर्करोगापर्यंतच्या विविध आजारांवर उपचार करण्यासाठी वैद्यकीय औषधी वनस्पती म्हणून वापरले जाते. त्यामुळे तुळशीची शेती फायदेशीर ठरू शकते. बियाण्यांपासून किंवा पाण्यात रुजवून रोपाची लागवड करणे सोपे आहे आणि त्याला फारच कमी देखभाल आवश्यक आहे. तुम्ही तुळस घरामध्ये कुंडीत ठेवू शकता किंवा तुमच्या भाज्या किंवा शोभेच्या बागेत देखील आंतरपीक म्हणून तुलसी लागवड करू शकता.

तुळशीच लागवड पद्धत :उच्च-गुणवत्तेच्या मातीने फ्लॉवर प्लांटर अर्धवट भरा आणि त्यास पूर्णपणे पाणी द्या. सुमारे एक इंच (२.५४ सेमी) खोली सोडा. माती ओलसर करण्यासाठी पुरेसे पाणी घाला, परंतु जास्त नको. जरी तुमची तुळशी बाहेर बेड करून लावू इच्छित असाल तरीही ते रोपण करण्यापूर्वी ते घरामध्येच वाढवण्याचा सल्ला दिला जातो. जमिनीच्या पृष्ठभागाच्या खाली १४ इंच (०.६४ सेमी) बिया पेरा तुळशीच्या बिया खूप लहान असल्यामुळे त्या जमिनीच्या वर शिंपडा आणि हळूवारपणे बोटांनी दाबा. बियाणे अंकुर येईपर्यंत ओलसर वातावरण ठेवा सुमारे १-२ आठवड्यांत, बिया फुटतील.

बिया खूप संवेदनशील असल्यामुळे, स्प्रे बाटलीने मातीच्या पृष्ठभागावर हलके शिंपडा. बियाण्यांना त्रास होऊ नये म्हणून भांड्यात पाणी टाकणे हळूहळू आणि काळजीपूर्वक केले पाहिजे. फ्लॉवर कंटेनरचा वरचा भाग प्लास्टिकच्या आवरणाने झाकल्याने ओलावा टिकवून ठेवण्यास मदत होऊ शकते, तरीही आपल्याला माती तपासावी लागेल आणि आवश्यक असल्यास अतिरिक्त पाणी द्यावे लागेल. तुमच्या वनस्पतीला दररोज ६-८ तास थेट सूर्यप्रकाश आणि किमान ७० अंश फॅरेनहाइट (२१ अंश सेल्सिअस) तापमान आवश्यक असते. भांडे अशा ठिकाणी ठेवा जिथे त्याला भरपूर अप्रत्यक्ष सूर्यप्रकाश मिळेल. रात्रभर तापमान कमी झाल्यास, झाडाला खिडक्या किंवा दारे उघड्या न ठेवण्याची काळजी घ्या.

फक्त १५,००० रुपये गुंतवा :या शेतीसाठी सर्वात चांगली गोष्ट अशी आहे की तुम्हाला सुरुवात करण्यासाठी खूप पैशांची गरज नाही आणि तुम्हाला ते करण्यासाठी खूप जमिनीची गरज नाही. तुम्ही हा व्यवसाय १५,००० रुपयांमध्ये सुरू करू शकता.

३ महिन्यात ३ लाख कमवा :बियाणे पेरल्यानंतर, तुम्हाला या व्यवसायात कापणीसाठी जास्त वेळ प्रतीक्षा करावी लागत नाही. हे रोप फक्त ३ महिन्यांत तयार होणार असून, तुळशीचे पीक सुमारे ३ लाखांना विकले जाणार आहे. अनेक आयुर्वेदिक उत्पादन उत्पादकांना तुळशीची रोपे लागतात, अशा प्रकारे ते कंत्राटी शेतीद्वारे त्यांची खरेदी करतात. डाबर, वैद्यनाथ आणि



पतंजलीसह अनेक कंपन्या तुळशीच्या शेतीत गुंतलेली आहेत. याचा अर्थ तुम्ही फक्त ३ महिन्यांत ३ लाख कमवू शकता.

तुळशीच्या शेतीसाठी कर्ज आणि अनुदान :नॅशनल मेडिसिनल प्लांट बोर्ड, जे आयुष मंत्रालयाचा भाग आहे. शेतकऱ्यांना औषधी पीक लागवड आणि व्यवस्थापनासाठी अनुदान देते. अनुदान संस्थेच्या प्रजातींच्या व्याख्येवर आधारित आहे, याबाबतची माहिती एनएमपीबी वेबसाइटवर स्पष्टपणे नमूद केले आहे. केंद्रीय आयुष मंत्रालय एनएएम (राष्ट्रीय आयुष मिशन) योजनेतील औषधी वनस्पतींचा भाग लागू करत आहे, ज्यामध्ये निवडलेल्या जिल्ह्यांमधील विशिष्ट क्लस्टर्स/झोन्समध्ये प्राधान्य औषधी वनस्पतींची बाजार-चालित शेती समाविष्ट आहे. या कार्यक्रमांतर्गत १४० औषधी वनस्पतींच्या शेतीसाठी विशिष्ट वनस्पती प्रजातींच्या उत्पादन खर्चाच्या ३०%, ५०% आणि ७५% अनुदान दिले जाते.

# हळद लागवडीसाठी शिका नवे तंत्र

हळद पिकांत उत्पन्नाचा मुख्य स्रोत जमिनीत वाढणारा कंद असतो. त्यामुळे लागवडीसाठी योग्य जमिनीची निवड महत्त्वाची ठरते. मध्यम प्रतीची, काळी, पाण्याचा निचरा होणारी जमीन हळद पिकासाठी योग्य असते. पाण्याचा ताण व जास्त पाऊसमान हे पीक काही काळ सहन करू शकते. मात्र, जास्त पिकात पाणी साचून राहिल्यास पिकावर विपरित परिणाम दिसून येतात. पाण्याचा निचरा न झाल्यास कंदकुज होण्याची शक्यता असते. हळद पिकाच्या वाढीसाठी सरासरी २५ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान वाढीसाठी आवश्यक असते. उगवणीसाठी ३० ते ३५ अंश सेल्सिअस, फुटवे फुटण्यासाठी २५ ते ३० अंश सेल्सिअस, कंद वाढीसाठी २० ते २५ अंश सेल्सिअस, तर कंद पोसण्यासाठी १८ ते २० अंश सेल्सिअस तापमानाची आवश्यकता असते. कोरडे व थंड हवामान कंद वाढीस पूरक ठरते. जास्त तापमान असलेल्या भागात तापमानाची तीव्रता कमी झाल्यानंतरच हळद लागवड करावी. अन्यथा, कमाल तापमानामुळे उगवणीवर विपरित परिणाम होतो.

सुधारित वाण :हळद लागवडीसाठी फुले हरिद्रा, फुले स्वरूपा, सेलम, राजापुरी, कृष्णा, टेकुरपेटा, वायगाव, आंबे हळद हे सुधारित वाण विकसित करण्यात आले आहेत. याशिवाय भारतीय मसाला पिके संशोधन केंद्र, कोझीकोड (केरळ) यांनी सुवर्णा, सुगुणा, सुदर्शना, प्रभा, आयआयएसआर प्रतिभा, आयआयएसआर केदारम हे वाण विकसित केल्या आहेत. तसेच तमिळनाडू कृषी विद्यापीठ, कोईंमबतूर यांच्यामार्फत बीएसआर-१, बीएसआर-२ हे वाण विकसित करण्यात आले आहेत. लागवडीसाठी सुधारित वाणांची निवड महत्त्वाची आहे.

लागवड पद्धती :पाणी देण्याच्या पद्धतीनुसार हळद लागवडीच्या प्रामुख्याने सरी- वरंबा आणि



रुंद वरंबा या दोन पद्धती आहेत.

१) सरी - वरंबा पद्धत :पाटपाणी पद्धतीने सिंचन द्यावयाचे असल्यास सरी- वरंबा पद्धतीने लागवड करावी. या पद्धतीने लागवडीसाठी ७५ ते ९० सें.मी. अंतरावर सरी पाडून घ्यावी. त्यापूर्वी स्फुरद आणि पालाशची मात्रा जमिनीत द्यावी. कारण स्फुरद आणि पालाश खते जमिनीत दिल्यानंतर पिकांस लगेच उपलब्ध होत नाहीत. जमिनीच्या उताराप्रमाणे ६ ते ७ सरी वरंब्याचे एक वाकुरे या प्रमाणे वाकुरी बांधून घ्यावी. वाकुऱ्याची लांबी ही शेताची लांबी आणि जमिनीचा उतार लक्षात घेऊन ५ ते ६ मीटर ठेवावी. सोईप्रमाणे पाणी व्यवस्थित बसण्यासाठी पाण्याचे पाट सोडावेत.

२) रुंद वरंबा पद्धत :ठिबक सिंचन सारख्या आधुनिक सिंचन सुविधा उपलब्ध असल्यास रुंद वरंबा पद्धतीने लागवड फायदेशीर ठरते. रुंद वरंबा तयार करताना १२० सें.मी. अंतरावर सऱ्या पाडून घ्याव्यात. नंतर त्या सऱ्या उजवून ६० ते ७५ सें. मी. माथा असलेले २० ते ३० सें.मी. उंचीचे व उताराचे प्रमाण लक्षात घेऊन योग्य लांबी रुंदीचे वरंबे (गादीवाफे) तयार करावेत.

लागवड वेळ आणि पद्धत :लागवड जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पूर्ण करावी. लागवडीस उशीर होईल तसा उत्पादनावर परिणाम होतो. एक हेक्टर क्षेत्रावर लागवडीसाठी २५ क्विंटल जेठे गड्डे (म्हणजेच मातृकंद आकाराने त्रिकोणाकृती) बेणे पुरेसे होते. जास्त उत्पादन मिळविण्यासाठी जेठे गड्डे वापरावेत. बेणे वजनाने ५० ग्रॅमपेक्षा अधिक, सशक्त, निरोगी, रसरशीत, नुकतीच सुप्तावस्था संपवून थोडेसे कोंब आलेले असावे. जेठे गड्डे उपलब्ध होत नसतील, तर बगल गड्डे (४० ते ५० ग्रॅम वजनाचे) किंवा हळकुंडे (वजनाने ३० ग्रॅमपेक्षा मोठे) बेणे म्हणून वापरावे. निवडलेली हळकुंडे ठळक, लांब, जाड, ठसठशीत वाढलेली, निरोगी आणि एकसमान (भेसळमुक्त) असावीत. हळकुंडे जमिनीमध्ये समांतर वाढतात. अशावेळी दोन ओळींत शिफारस केल्याप्रमाणे पुरेसे अंतर ठेवावे. लागवड जमिनीच्या समांतर करावी.

लागवडीपूर्वी बेण्यास रासायनिक आणि जैविक बेणेप्रक्रिया अवश्य करावी. प्रथम रासायनिक बेणेप्रक्रिया करून नंतर जैविक बेणेप्रक्रिया करावी. कोणत्याही परिस्थितीत जैविक बेणेप्रक्रिया रासायनिक प्रक्रिये अगोदर करू नये. रासायनिक प्रक्रिया केल्यानंतर बियाणे सावलीमध्ये दोन ते तीन दिवस सुकवून नंतर जैविक बीजप्रक्रिया करावी.

खत व्यवस्थापन :हळद पिकांस सेंद्रिय खतांचा भरपूर पुरवठा केल्यास उत्पादन वाढीस मदत मिळते. त्यासाठी पूर्वमशागतीवेळी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ३५ ते ४० टन प्रमाणे चांगले मिसळावे. शेणखतामुळे गड्ड्यांची वाढ चांगली होते. पुरेसे शेणखत उपलब्ध नसल्यास, इतर सेंद्रिय निविष्ठांचा वापर करावा. हळद पिकास हेक्टरी २०० किलो नत्र, १०० किलो स्फुरद आणि १०० किलो पालाश देण्याची शिफारस आहे. संपूर्ण स्फुरद आणि पालाश लागवडीवेळी, तर नत्राची मात्रा २ समान हप्त्यांत विभागून द्यावी. नत्राचा पहिला हप्ता (१०० किलो नत्र) लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावे. त्यासोबत फेरस सल्फेट आणि झिंक सल्फेट प्रत्येकी १२ किलो द्यावे. नत्राचा दुसरा हप्ता म्हणजेच १०० किलो नत्र भरणीवेळी (लागवडीनंतर २.५ ते ३ महिन्यांनी) द्यावे.

पाणी व्यवस्थापन :हळद पिकास सुरुवातीच्या काळ हा मुळांना जमिनीत स्थिरता प्राप्त होण्याचा काळ असतो. या कालावधीत आंबवणीचे पाणी लगेच ४ ते ६ दिवसांच्या अंतराने द्यावे. हलक्या ते मध्यम जमिनीत पाण्याच्या १३ ते १५ पाळ्या द्याव्या लागतात. सिंचन कमी पडले तर कंदांची योग्य वाढ होत नाही.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७९२ : केंटुकी अमेरिकेचे वे१५ राज्य बनले.
१७९६ : टेनेसी अमेरिकेचे वे१६ राज्य बनले.
१८३१ : सरजेम्स रॉस यांनी पृथ्वीच्या चुंबकीय उत्तर ध्रुवाचे स्थान निश्चित केले.
१८७४ : स्वातंत्र्य पूर्व भारतातील ब्रिटीश सरकारची इस्ट इंडिया कंपनी संपुष्टात आली.
१९२९ : प्रभात फिल्म कंपनीची कोल्हापूर येथे स्थापना.
१९३० : मुंबई व पुणे दरम्यान दख्खनची राणी ही रेल्वेगाडी सुरू झाली.
१९४५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेची भारतीय विज्ञान संस्थेच्या परिसरात स्थापना
१९५९ : द. गो. कर्वे पुणे विद्यापीठाचे तिसरे कुलगुरू झाले.
१९६१ : अमेरिकेतील फेडरल कम्युनिकेशन्स कमिशन ला जगात सर्वप्रथम स्टिरीओ एफ. एम. प्रसारणासाठी परवानगी मिळाली.
१९९२ : भारत व इजराईल या दोन देशांतर्गत हवाई मार्गाबाबत करार करण्यात आला.
१९९६ : भारताचे वे११ पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांनी सूत्रे हाती घेतली.
२००१ : नेपाळचे राजे वीरेंद्र, राणी ऐश्वर्या यांच्यासह अकरा जणांची युवराज दीपेंद्र यांनी निर्घृण हत्या केली.
२००३ : चीन मधील महाप्रचंड थ्री गॉर्जेस धरणात पाणी साठवण्यास सुरुवात झाली.
२००४ : रमेशचंद्र लाहोटी भारताचे वे३५ सरन्यायाधीश यांनी सूत्रे हाती घेतली.
२००७ : साली ब्रिटन देशांत सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करण्यास सक्त मनाई करण्यात आली.
२०१४ : नायजेरिया देशांतील फुटबॉल खेळाच्या मैदानात झालेल्या बॉम्बस्फोटा मध्ये ४० लोकांचा मृत्यू झाला होता.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४२ : पहिले भारतीय सनदी अधिकारी सत्येंद्रनाथ टागोर यांचा जन्म. (मृत्यू: ९ जानेवारी १९२३)
१८४३ : फिंगरप्रिंटिंग चे जनक हेन्री फॉल्स यांचा जन्म. (मृत्यू: २४ मार्च १९३०)
१८७२ : मराठी कवी नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ कवी बी यांचा जन्म. (मृत्यू: ३० ऑगस्ट १९४७)
१९०७ : जेट इंजिन विकसित करणारे फ्रँक व्हाईट यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑगस्ट १९९६)
१९२६ : अमेरिकन अभिनेत्री मेरिलीन मन्रो यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट १९६२)
१९२९ : नर्गिस दत्त, भारतीय अभिनेत्री.
१९३७ : मॉर्गन फ्रीमन, अमेरिकन अभिनेता.
१९३८ : प्रसिद्ध भारतीय हिंदी भाषिक कवी व लेखक बलदेव वंशी यांचा जन्मदिन.
१९४७ : मॅक्लारेन ग्रुप चे संस्थापक रॉन डेनिस यांचा जन्म.
१९६५ : इंग्लिश बुद्धिबळपटू नायगेल शॉर्ट यांचा जन्म.
१९७० : आर. माधवन, हिंदी चित्रपट अभिनेता.
१९७५ : भारतीय सर्वोच्च क्रीडा सन्मान राजीव गांधी खेळ रत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार तसचं, पद्मश्री पुरस्कार सन्मानित पहिल्या भारतीय ऑलिम्पिक पदक विजेता भारतीय भार्तोलन खेळाडू कर्णम मल्लेश्वरी यांचा जन्मदिन.
१९८५ : भारतीय क्रिकेटपटू दिनेश कार्तिक यांचा जन्म.
१९९१ : भारतीय युवा महिला क्रिकेटपटू राजेश्वरी गायकवाड यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८३० : भारतीय धार्मिक नेते स्वामीनारायण यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १७८१)
१८६८ : अमेरिकेचे १५ वे राष्ट्राध्यक्ष जेम्स बुकॅनन यांचे निधन. (जन्म: २३ एप्रिल १७९१)
१८७२ : न्यूयॉर्क हेरॉल्ड चे स्थापक जेम्स गॉर्डन बेनेट यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १७९५)
१९३४ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, प्रसिद्ध नाटककार आणि विनोदी लेखक.
१९४४ : आंतरराष्ट्रीय कीर्तीचे चित्रकार महादेव विश्वनाथ धुरंधर यांचे निधन. (जन्म: १८ मार्च १८६७)
१९६० : जर्मन-ऑस्ट्रियन बहीण पॉड हिटलर यांचे निधन. (जन्म: २१ जानेवारी १८९६)
१९६२ : दुसर्या महायुद्धात शेकडो ज्यू लोकांची कत्तल करणार्या ॲडॉल्फ आइकमॅन या जर्मन सेनापतीला इस्त्रायलमधे फाशी देण्यात आले.
१९६८ : अंध मूकबधिर असूनही कला शाखेची पदवी मिळवलेल्या पहिल्या व्यक्ती आणि समाजसेविका हेलन केलर यांचे निधन. (जन्म: २७ जून १८८०)
१९८४ : हिंदी-मराठी चित्रपट अभिनेते नाना पळशीकर यांचे निधन.
१९८७ : दिग्दर्शक, पटकथाकार आणि लेखक के.ए. अब्बास यांचे निधन. (जन्म: ७ जून १९१४)
१९९६ : नीलम संजीव रेड्डी, भारताचे सहावे राष्ट्रपती.
१९९८ : गो. नी. दांडेकर, ज्येष्ठ साहित्यिक.
१९९९ : होव्हर्क्राफ्ट चे निर्माते शोध ख्रिस्तोफर कॉकेरेल यांचे निधन. (जन्म: ४ जून १९१०)
२००० : एकपात्री कलाकार मधुकर महादेव टिल्लू यांचे निधन.
२००१ : नेपाळचे राजे वीरेन्द्र यांची हत्या. (जन्म: २८ डिसेंबर १९४५)
२००२ : दक्षिण अफ्रिकेचा क्रिकेट कप्तान हॅन्सी क्रोनिए यांचे विमान अपघातात निधन. (जन्म: २५ सप्टेंबर १९६९)

## थोडक्यात



बीड: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य अॅड.सुभाष भाऊ राऊत, धनगर समाजाचे नेते रंजित सोन्नर, कुंभार समाजाचे नेते अर्जुन दळे, नितीन राऊत, महात्मा फुले जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष अजिंक्य सुरवसे,स्वप्नील शिंदे, महेश सोन्नर, महेश व्यवाहारे, निलेश राऊत, अजय भानोसे आदींसह समता सैनिक उपस्थित होते.



पिंपळवंडी : पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पत्रकार बबनराव उकांडे यांच्या निवासस्थानी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशताब्दी जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.यावेळी उकांडे परिवारातील सर्व सदस्य सहभागी झाले होते.



केज : तालुक्यातील माळेवाडी येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त ग्रामस्थांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.



पिंपळवंडी: जनकल्याणाचे व्रत घेतलेल्या आदर्श शासनकर्त्या,प्रजानिष्ठ,राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त पुष्पगुच्छ,पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी सरपंच निलेश मोरे,ग्रामपंचायत सदस्य अशोक गुजर,बंडू अण्णा पवार, शहादेव पवार,माजी उपसरपंच रामनाथ भनगे,पत्रकार तथा माजी उपसरपंच बबनराव उकांडे,पत्रकार भाऊसाहेब पवार तसेच राजेंद्र पवार,सुनील पवार,भरत पवार,तुकाराम शिंदे,सचिन पवार,सत्यवान जाधव,शिवाजी भणगे,गोरख क्षिरसागर आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# गुजर समाजाच्या विद्यार्थ्यांस अडचण आल्यास समाज म्हणून एकत्र येवू -रतन गुजर





बीड। प्रतिनिधी

दि.३० मे २०२५ रोजी अखिल भारतीय गुजर देवसेना संस्था मार्फत गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमाला गुजर समाज देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर, कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित असलेले देवसेनेचे संस्थापक अध्यक्ष बालुरामजी गुजर, बन्सीलाल गुजर, मुकेश चावडा, गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ, गुजर समाज सेवा संघाचे माजी जिल्हाध्यक्ष अर्जुन बहिरवाळ, अॅड.युवराज भैय्या बहिरवाळ, जिल्हा उपाध्यक्ष सुनील गुजर, जिल्हा संघटक अरुण नाना खटाणे, जिल्हा सचिव विनायक गुजर, जिल्हा कोषाध्यक्ष गजानन बहिरवाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र गुजर, जिल्हा उपाध्यक्ष अशोक घुशीर, शिरूर तालुकाप्रमुख शहादेव डोंगर, तुकाराम डोंगर, बाळू डोंगर, सुनिल बहिरवाळ, नारायण बहिरवाळ, लक्ष्मण बहिरवाळ, लहू दहे, पिनु डोंगर, हलीम पठाण यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष रतन गुजर म्हणाले की, गुजर समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणाचे महत्व समजून स्वकर्तुत्व आणि स्वकष्टाने स्वतः च स्वाभिमानाच साम्राज्य निर्माण करुन समाजाच्या बौद्धिक आर्थिक सामाजिक प्रगतिला हातभार लावावा तसेच शिक्षणामध्ये काही अडचण आल्यास तो प्रश्न तुमचा नाही तो प्रश्न सर्व समाजाचा असे समजून आम्ही तुम्हाला समाजामार्फत सहकार्य करु असे आश्वासन दिले.तसेच आई-वडिलांनी मुलाकडे लक्ष देणे गरजेचे आहे आपण मुलांना वेळ देणे गरजेचे आहे त्याच्या समस्या काय आहेत ते समजून घेणे गरजेचे आहे त्याची आवड निवड समजून घेणे गरजेचे आहे विद्यार्थी हा मातीचा गोळा आहे त्याला घडवणे प्रथम आई वडील नंतर शिक्षक एकदा विद्यार्थी बारावीच्या पुढे गेला की त्याला समजू लागते मुलींना पण मुलाबरोबर शिकवा प्रत्येक क्षेत्रामध्ये मुली कमी नाहीत असा संदेश देवसेनेचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांनी दिला कार्यक्रमाच्या शेवटी आलेल्या उपस्थितांसाठी समाज बांधवांकडून भोजन व्यवस्था करण्यात आली होती. या कार्यक्रमाला गुजर समाजाचे सर्व मान्यवर अनेक समाज बांधव उपस्थित होते.

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती साजरी

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आज दि.३१ वार शनिवार रोजी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख उपस्थिती म्हणून लिंबागणेशचे भुमिपुत्र नवनियुक्त पुरवठा निरीक्षक म्हणून बुलढाणा येथे कार्यरत असलेले प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची उपस्थिती होती. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम टायगर ग्रुप बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी मानले.



प्रमुख वक्ते म्हणून डॉ.गणेश ढवळे यांनी कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा जीवनपट उलगडताना मध्ययुगीन कालखंडात भारताच्या इतिहासात ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये राजमाता जिजाऊ नंतर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे अद्वितीय स्थान असुन धार्मिक, सामाजिक आणि राजकीय कर्तृत्ववाने भारतभर त्यांनी मोठी किर्ती आणि नावलैकीक मिळवले.संपुर्ण भारतभर मंदिरे बांधणे,मंदिरांचा जीर्णोद्धार,नद्यांवर घाट बांधणे, पिण्याच्या पाण्यासाठी विहिरी खोदणे, धर्मशाळा बांधणे, अन्नछत्रे चालवणे आदी लोककल्याणकारी कार्याच्या खुणा आजही भारतभर दिसून येतात.२४ मार्च १७५४ मध्ये पती खंडेराव यांना सूरजला जाट बरोबर कुंभेरी येथे झालेल्या लढाईत वीर मरण आले. तो काळ सती प्रथेचा होता. त्या काळात खंडेरायांच्या सोबत सती जाण्याचे नाकारून अहिल्यामाईंनी आपल्या पुरोगामित्वाचा परिचय दिला होता .आता अहिल्यामाईंनी धर्म,प्रथा, रूढी ,परंपरा या पलीकडे कर्तव्य महत्त्वाचे मानुन लोककल्याणासाठी जगण्याचा निर्धार केला. ज्या रूढी, प्रथा, परंपरा अंधाराकडुन प्रकाशाकडे नेतात त्याच आम्हाला मान्य आहेत अशी ठाम भूमिका घेतली. धार्मिक भावना जपत चुकीच्या पुढे परंपरांना छेद दिला.

सतीप्रथा, हुंडाप्रथा, बालविवाह यास विरोध करत धर्म चिकित्सेला प्रारंभ करणाऱ्या अहिल्यामाईंचे विचार आणि कृती क्रांतिकारक आणि प्रेरणादायी होती.अहिल्यामाई होळकर यांनी महिला सशक्तीकरणावर विशेष भर दिला होता .विधवा स्त्रियांसाठी कायद्यात बदल केले. त्यांना मुल दत्तक घेण्याचा अधिकार, उदरनिर्वाहाकरीता पतीच्या संपत्तीत अधिकार मिळवून दिला. शिवाय दत्तक पत्रावर आकारला जाणारा नजराणा( कर ) रद्द केला. स्त्रीसक्षमीकरणाच्या दृष्टीने ही पावले क्रांतीकारक होती असे प्रतिपादन केले. यावेळी राजेभाऊ गिरे, अनंतकाका मुळे,उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, रमेश गायकवाड, समीर शेख, अशोक जाधव, सुरेश निर्मळ, युवराज गिरे, रामचंद्र मुळे,आदी उपस्थित होते.

लिंबागणेशचे भुमिपुत्र प्रथमेश राजेभाऊ गिरे यांची पुरवठा निरीक्षक पदी बुलढाणा येथे नियुक्ती झाल्याबद्दल शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याचवेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा गट प्रवर्तक सिमाताई वखरे व ज्योती गिरे यांचा ग्रामपंचायतच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सन्मान पत्र,रोख पाचशे रुपये आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# वहाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उच्चस्तरीय समिती नेमुन कारवाई करावी

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वहाली येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वाजले तिनं तेरा दवाखाना वेळ शासकीय सकाळी ८.३० ते १२.३० व दुपारी ४ ते ६ ओपीडी असताना.व ठिकाणी पुरेसा डॉक्टर वर्ग सह अधिक कर्मचारी असूनही दि.३० रोजी दुपारी साडेचार च्या दरम्यान प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप लटकलेले होते याबाबत निवडंगा येथील पेशंट छगन सुळे वयोवृद्ध व्यक्ती आले होते.तरी याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन तात्काळ तालुका आरोग्य अधिकारी सह वहाली प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर सह कर्मचारी व कारवाई करावयाची मागणी होत आहे याबाबत अधिक माहिती अशी की तालुक्यातील ग्रामीण भागात आरोग्य विभागाचा कारभार चिंताजनक बनला आहे. वहाली प्राथमिक आरोग्य केंद्रांवर तर दि.३० रोजी चक्क कुलूप लटकलेले होते तर शासकीय अधिकारी आणि





कर्मचारी उपस्थित राहत नाहीत.

कधी उपस्थित राहिलेतर रुग्णांना सौजन्यपूर्ण सेवा देत नाहीत. ग्रामीण भागातील रुग्णांना यामुळे खाजगी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो.जिथे त्यांची आर्थिक शोषण होते आणि काहीवेळा उपचार लवकर न भेटल्यामुळे जीव गमवावे लागतात.स्थानिक लोकांचा आरोप आहे की, कर्मचाऱ्यांची बेपर्वाई यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. वहाली येथे कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी क्वाटर ही उपलब्ध आहे परंतु हे लोक इथं न राहता. तालुक्याच्या जिल्ह्याच्या ठिकाणी राहून अपडाऊन करतात. त्यामुळे हे दिवसाचं नागरिकना उपलब्ध नसतात.रात्री अपरात्री तर कधीच उपयोग नाही. शासकीय यंत्रणेची ही निष्क्रियता आहे त्यामुळे खाजगी रुग्णालयांचे फावते.ते नागरिकाचे शोषण करतात.त्याला हे अधिकारी व कर्मचारी जबाबदार आहेत .हे सारं थांबवण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. या प्राथमिक आरोग्य केंद्राची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी व उच्चस्तरीय चौकशी करून त्या.आरोग्य अधिकारी पाटोदा यांची चौकशी करून कारवाई करावी याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ गंडाळ सर यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे

# तुलसी समूहाच्या डॉ.अब्दुल कलाम महाविद्यालयास नॅकचा 'बी' दर्जा प्राप्त

बीड। प्रतिनिधी

तुलसी शैक्षणिक समूह अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या नेकनूर येथील डॉ.अब्दुल कलाम संगणकशास्त्र आणि माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयास नॅशनल असेसमेंट अँड अँक्रिडेशन कौन्सिलने (नॅक) पुढील पाच वर्षांसाठी ''बी'' दर्जा प्रदान केला आहे. नॅक च्या तीन सदस्यीय मूल्यांकन समितीने दिनांक २३ आणि २४ मे २०२५ रोजी महाविद्यालयास ऑनलाइन भेट देऊन शैक्षणिक पाठ्यक्रम, शिक्षकांची गुणवत्ता, संशोधन, विद्यार्थी केंद्रित उपक्रम, इमारत आणि तंत्रज्ञान या सात मुख्य निकषांवर महाविद्यालयाची सखोल तपासणी केली. सर्व निकषांचे योग्यरित्या परीक्षण करून नॅक ने या महाविद्यालयाला दिनांक २९ मे २०२५ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी २.०६ स्कोअरसह '' ग्रेड प्रदान केला आहे.

डॉ.अब्दुल कलाम कॉलेजने एक ऐतिहासिक कामगिरी करत बीड जिल्ह्यातील पहिले विनाअनुदानित आयटी महाविद्यालय म्हणून नॅक मूल्यांकनात यश मिळवले आहे. हे महाविद्यालय ग्रामीण भागात असूनही गुणवत्ता, शैक्षणिक बांधिलकी आणि आधुनिक सुविधांच्या जोरावर नॅकच्या कठोर निकषांमध्ये यशस्वी ठरले आहे. यामुळे बीड जिल्ह्यातील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. या यशामागे प्रा.डॉ.लक्ष्मीकांत गौड व प्रा.संतोष तोंडारे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा.प्रदीप रोडे यांनी प्राचार्य, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डी. जी. निकाळजे व प्रा.फुलचंद धनवे,प्रा.समीर मिर्झा, प्रा,साबळे स्वाती, प्रा.प्राची पाठक, प्रा.संतोष चव्हाण, वंजारे यशोजीत, वंजारे प्रमोद, विद्यागर भैय्यासाहेब यांचेसह संपूर्ण टीमचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की,''नॅकचा '' दर्जा मिळवणे हा संस्थेच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हा दर्जा केवळ प्रमाणपत्र नसून, संस्थेतील सतत चालू असलेल्या गुणवत्ता सुधारणा प्रक्रियेचे प्रतिबिंब आहे. आमचे भविष्यातील ध्येय '' ग्रेड मिळविण्याकडे आहे. महाविद्यालयास '' दर्जा प्राप्त झाल्याबद्दल विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'एमपीएल'मध्ये बीडच्या पाच खेळाडूंची निवड

## बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा



बीड । प्रतिनिधी

दि.३१ : बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पाच खेळाडूंनी महाराष्ट्र प्रीमियर लीग (एमपीएल) स्पर्धेसाठी निवड सुनिश्चित केली आहे. यामध्ये सचिन धस (कोल्हापूर टस्कर्स), ऋषिकेश सोनवणे (पुणेरी बाप्पा), सौरभ नवले आणि देव नवले (सातारा वॉरियर्स), तसेच समर्थ कदम (रत्नागिरी जेट्स) या खेळाडूंचा सहभाग आहे.

ही निवड केवळ खेळाडूंच्या मेहनतीचे फलित नसून बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या पारदर्शक आणि गुणवत्तेला प्राधान्य देणाऱ्या निवड प्रक्रियेचेही प्रत्यक्ष फलित आहे. अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्रे, ब्रँडेड सुविधा आणि मोठ्या आर्थिक पाठबळाचा अभाव असूनही बीडचे खेळाडू राज्यस्तरावर चमकत आहेत, ही बाब निश्चितच जिल्ह्यासाठी गौरवाची आहे. या यशाबद्दल खेळाडूंना बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर, कार्याध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, सचिव आमेर सलीम, तसेच महेश वाघमारे, राजन साळवी, इरफान कुरेशी, मनोज जोगदंड, जावेद पाशा, रिजवान खान, शेख आरेफ, अतीक कुरेशी, सुनील गोपी शेट्टी, गोपाल गुरखूदे, सरफराज मोमीन, अक्षय नरवडे, पठाण शाहरुख आदींनी अभिनंदन केले आहे.

# महेशनवमी निमित्त गुणवंत सत्कार व रक्तदान शिबिराचे आयोजन

माजलगाव। प्रतिनिधी

महेश नवमी निमित्त तालुका माहेश्वरी सभेकडून दि ०२ जून रोजी गुणवंत विध्यार्थी यांचा सत्कार तर दि ०३ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेश जेथलिया व सचिव गोपाल मानधने यांनी दिली.

दरवर्षी प्रमाणेच या वर्षीही महेश नवमी दोन दिवस उत्साहात साजरी होणार असून दि ०२ जून रोजी दुपारी ४:०० वाजता बालाजी मंदिर येथून भगवान महेशची मूर्तीचि पालखीतुन शोभायात्रा निघणार आहे. त्यानंतर राजस्थानी मंगल कार्यालय येथे गुणवंत विध्यार्थी यांचा सत्कार उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले,भा.शि.प्र.चे केंद्रीय सदस्य अमरनाथ खुर्पे व प्रकाश दुगड, ओमप्रकाश करवा यांच्या हस्ते होणार आहे.दि ०३ जून रोजी सकाळी ९:०० ते दुपारी १:०० यावेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.तर सायंकाळी ५:३० वाजता राजेंद्र करवा यांच्या अध्यक्षतेखाली महेश रत्न पुरस्काराचे वितरण प्रदेश संघटन मंत्री ॲड चिरंजीलाल दागडिया यांच्या हस्ते ॲड जयप्रकाश कलंत्री, अमृतकाका सारडा यांच्या उपस्थिती मध्ये होणार आहे. महाप्रसादाचे यजमान करवा परिवार आहे.सर्व कार्यकामासाठी राजस्थानी समाज बांधवानी उपस्थित राहावे असे आवाहन तालुका माहेश्वरी सभेचे अध्यक्ष उमेश जेथलिया, सचिव गोपाल मानधने व सर्व पदाधिकारी यांनी केले आहे. तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने मागील तीन वर्षांपासून महेश रत्न पुरस्काराचे वितरण करण्यात येते.या वर्षी हा पुरस्कार जय महेश शुगरचे संस्थापक डॉ.आर.जी.बजाज, जय महेश उद्योगचे शिवप्रसाद भूतडा तसेच मरणोत्तर स्व नंदलाल मानधने व स्व श्रीरामजी चांडक यांना देण्यात येणार आहे.

# पिंपळवंडी परिसरात पावसाने नदी- नाले दुथडी भरून वाहू लागले

पिंपळवंडी। प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी व अंमळनेर परिसराला गुरुवारी दि.२९ रोजी झालेल्या धुवाधार पावसाने झोडपले.रात्री विजेचा लखलखाट व मेघगर्जनेसह तुफान पाऊस कोसळला.पाटोदा तालुक्यात मे महिन्याच्या पंधरा दिवसापासून अनेक भागात पावसाला सुरुवात झाल्याने शेतीच्या मशागतीपूर्व कामाची वाताहत झाल्याने शेतकरी मोठ्या चिंतेत आहे.यावर्षी भर उन्हाळ्याच्या मे महिन्यात पावसाने सुरुवात केल्याने परिसरातील नाले,पाझर तलावांच्या सांडव्यावरून पाणी पडून नदी-नाले दुधडी भरून वाहत असल्याचे परिसरात चित्र पहावयास मिळत आहे.दि.२९ मे गुरुवार रोजी रात्री झालेल्या पावसाने धोपटवाडी तलाव भरून सांडव्यावरून ओसांडून पाणी वाहत आहे.परिसरात उन्हाळी फळबाग,कांदा पिकांचे तसेच भाजीपाला,आंब्याचे सुद्धा अनेक ठिकाणी अतोनात नुकसान झालेले आहे.

# बीड आगाराला पिंपळवंडी- अंमळनेर-धामणगाव-अहिल्यानगर महामार्गावरून जादा बस सोडण्याची ॲलर्जी

## या मार्गावरून लांब पल्ल्याच्या दोनच बस करतात ये-जा

पिंपळवंडी। प्रतिनिधी

बीड-लिंबादेवी फाटा-निरगुडी- डोंगरकिन्ही-पिंपळवंडी-अंमळनेर धामणगाव-दौलावडगाव-अहिल्यानगर हा महामार्ग रस्ता कमी अंतराचा वेळ व इंधनाची बचत करणारा जवळचा मार्ग असल्यामुळे या मार्गावरून रात्रंदिवस २४ तास मोठ्या प्रमाणात जड-अवजड सह सर्व प्रकारच्या खाजगी वाहणासह लक्झरी बसची मोठ्या प्रमाणात वाहतूक चालू आहे.रस्ता वाहतुकीस सुसज्ज असताना या मार्गावरून मात्र राज्य परिवहन महामंडळाच्या बीड आगारातून सकाळच्या वेळेत ६:३० वाजता बीड-पुणे व ७:३० वाजता बीड-कल्याण या दोनच मोजक्याच बसेस जाऊन परतीचा प्रवास करतात. त्या सुद्धा बीड आगारातून वेळेत निघत नाहीत.या मार्गावरील प्रवाशांना अनेक वेळा ताटकळत थांबून बस कधी येते याची प्रतीक्षा करावी लागते. या दोन बस गेल्यानंतर मध्यान काळात अतिरिक्त बसची गरज असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे.बीड आगारातून या मार्गावरून दर २ तासाला बीड ते अहिल्यानगर पर्यंत जाऊन परत येणाऱ्या जादा बस सुरू कराव्यात म्हणजे जेष्ठ नागरिक, महिला,विद्यार्थी,आजारी रुग्णांची गैरसोय दूर होऊन एस.टी. महामंडळाच्या सुविधांचा सर्वांना लाभ घेता येईल.या परिसरातील प्रवाशांची अनेक वर्षापासून बीड आगारातून नवीन बस सुरू करण्यात याव्यात म्हणून मागणी केली जात आहे.परंतु, या परिसरातील लोकप्रतिनिधी सामान्य जनतेची दखल घेण्यासाठी नवीन बस सुरु करण्यासाठी 'डोके' लावत नाहीत.तसेच वरिष्ठांनी चालक वाहकांना वेळेतच 'ड्युटी' वर जाण्याची सक्ती करावी म्हणजे बस वळेवर निघतील व प्रवाशांची हेळसांड होणार नाही.बीड आगारप्रमुखांनी या रहदारीच्या मार्गावर प्रवाशांच्या सोयीसाठी बीड ते अहिल्यानगर ज्यादा बसेस सह,बीड ते मुंबई,बीड ते नाशिक,बीड ते शिर्डी,बीड ते पुणे तसेच दुपारच्या वेळेस बीड ते कल्याण या नवीन बस सुरू कराव्यात अशी सर्व स्तरातून मागणी जोर धरत आहे.

अहिल्यानगर ते खोपटी मुक्कामी बस सेवा सुरू

खोपटी हा दुर्गम व डोंगरी भाग असलेल्या गावात स्वातंत्र्यापासून पहिल्यांदाच आष्टी आगाराने अहिल्यानगर ते खोपटी मुक्कामी बस गेल्या आठ दिवसापासून सुरू केली आहे.याबद्दल खोपटी ग्रामस्थांनी आष्टी आगार प्रमुख यांचे आभार व्यक्त करून ग्रामस्थांनी वाहक चालकांचा सत्कार केला.ही बस खोपटी येथे मुक्कामी सुरू करावी यासाठी ग्रामस्थांनी आ.सुरेश धस यांच्याकडे मागणी केली होती.आ. धस यांच्या पुढाकाराने ही बस सुरू झालेली आहे.याबद्दल ग्रामस्थांनी आ. धस यांचे आभार मानले आहेत.ही बस अहिल्यानगर आगारातून सायंकाळी ४:४५ वाजता निघून धामणगाव-खिळद-डोईठाण- अंमळनेर-पिंपळवंडी मार्गे खोपटी तालुका शिरूर या ठिकाणी ७:३० वाजेपर्यंत मुक्कामी पोहोचते व सकाळी ६:३० वाजता खोपटी येथून परतीच्या प्रवासाला निघते.खोपटी येथे मुक्कामी बस येत असल्याने पिंपळवंडी व खोपटी येथील ग्रामस्थांची गैरसोय दूर झाली आहे.

# योगेश्वरी देवी संस्थानच्या विश्वस्त निवडीचा वाद

## सहा.धर्मादाय आयुक्तांच्या आदेशाला हायकोर्टाची स्थगिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील योगेश्वरी देवी संस्थान विश्वस्त मंडळाच्या व्यवस्थापनासंदर्भात सुरू असलेल्या वादप्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. न्यायमूर्ती रोहित डब्ल्यू. जोशी यांच्या खंडपीठाने शुक्रवारी (दि.३०) सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी दि. २८ मे २०२५ रोजी दिलेल्या आदेशास स्थगिती दिली आहे. त्यामुळे सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी १९ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या विश्वस्त पदाधिकारीकार्यांची पुनःश्च नियुक्ती करण्याच्या दिलेल्या आदेशावर स्थगिती आली आहे. तसेच, विद्यमान विश्वस्त मंडळ हेच सद्यपरिस्थितीत मंदिराचे व्यवस्थापन पाहणार असल्याचेही स्पष्ट झाले आहे.



या प्रकरणात याचिकाकर्ते अशोक तुळशीराम लोमटे व इतरांनी २०१६ साली सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केलेल्या घटना क्रमांक २५७/२००६ आणि २५८/२००६ बाबत आक्षेप नोंदवला होता. त्यानंतर जिल्हा न्यायालय, अंबाजोगाई यांनीही २८ फेब्रुवारी २०२३ रोजी ही घटना कायम ठेवली होती. मात्र, घटना तयार करताना ऐकले गेले नाही, या कारणास्तव सारंग पुजारी आणि इतरांनी उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. या अपिलावर ६ मे २०२५ रोजी न्यायालयाने ती घटना रद्द करत, सहाय्यक आयुक्तांना पुन्हा एकदा योग्य त्या पक्षकारांना संधी देऊन घटना ठरवण्याचे निर्देश दिले होते. तोपर्यंत २०१६ च्या घटनेनुसार कामकाज चालू राहील असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. मात्र, त्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावत सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी २८ मे २०२५ रोजी एक आदेश काढला. त्यानुसार १९ नोव्हेंबर २०१६ रोजी जे विश्वस्त पदाधिकारी होते त्यांनाच परत पदावर नेमण्याचे आदेशित करण्यात आले होते. हा आदेश हायकोर्टाच्या मूळ आदेशाच्या विरोधात आहे, असे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाने दिलेल्या आदेशात नमूद केले की, १९ नोव्हेंबर २०१६ रोजी कार्यरत असलेल्या मंडळास पुन्हा कार्यभार देण्याचा आदेश नाही. तरीही सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी ती व्याख्या चुकीच्या पद्धतीने केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे २८ मे २०२५ च्या आदेशाची अंमलबजावणी थांबवण्याचे आदेश देत न्यायालयाने यासंबंधी १३ जून २०२५ रोजी प्रतिवादींना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे विद्यमान विश्वस्त मंडळ हेच सद्यपरिस्थितीत मंदिराचे व्यवस्थापन पाहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. आर.एल. कुटे यांनी बाजू मांडली, तर राज्य सरकारच्या वतीने ॲड. जी.ए. कुलकर्णी यांनी कामकाज पाहिले. या प्रकरणामुळे अंबाजोगाईतील श्री योगेश्वरी देवी संस्थानच्या प्रशासनात आगामी काळात काय घडामोडी घडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लग्नातील हुंडा द्यायला सांग असे धमकावून विवाहितेच्या डोक्यात कोयत्याचा वार

दिंद्रुड । प्रतिनिधी

लग्नामध्ये मला तुझ्या वडिलांनी हुंडा दिला नाही हुंड्याचे पन्नास हजार रुपये घेऊन ये, असे धमकावून डोक्यात कोयत्याचा वार करत जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार दिंद्रुड हद्दीत घडला असून, विवाहित महिलेचा शारिरीक व मानसिक छळ केल्याप्रकरणी दिंद्रुड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.



सविता रमेश चव्हाण या विवाहित महिलेस, तिचा पती रमेश नारायण चव्हाण रा. माळतांडा तहत मोगरा (ता. माजलगाव) याने सविता हिस म्हणाला की, तुझ्या वडिलांनी मला लग्नात हुंडा दिला नाही त्यामुळे हुंड्याचे पन्नास हजार रुपये तुझ्या वडिलाकडून आणून दे असे धमकावले. विवाहितेने वडिलांची परिस्थिती गरीब असल्याने ते देऊ शकत नसल्याचे सांगितले मात्र रमेश याने नाहीतर तु माझ्या पहिल्या पत्नीला आणायला चल असे म्हणत शिवीगाळ करून डोक्यात कोयत्याचा वार केला आणि लाथाबुक्याने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिली व फिर्यादीचा शारिरीक व मानसिक छळ केला. डोक्यात गंभीर मार असल्याने फिर्यादीची ननंद सुनिता बाळू राठोड यांनी माजलगाव येथील खाजगी रुग्णालयात पुढील उपचारार्थ दोन दिवस दाखल केले. अशी फिर्याद सविता चव्हाण (माळतांडा तहत मोगरा ता. माजलगाव) हिने दिंद्रुड ठाण्यात दिली.

फिर्यादीच्या तक्रारीवरून पती रमेश नारायण चव्हाण याच्यावर गुरनं- १३१/२०२५ कलम ८५, ११५(२), ११८, ३५२, ३५१(२), ३५१ (३) भारतीय न्याय संहिता २०२३ सह कलम ४ हुन्डाबंदी अधिनियम १९६१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सपोनि अण्णाराव खोडेवाड यांचे आदेशाने सफौ नंदु वाघमारे करीत आहेत.

# निकालापूर्वीच विद्यार्थी कंपनीत रुजू

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तंत्रशिक्षणात महाराष्ट्रात अग्रेसर असणाऱ्या अंबाजोगाई येथील योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील विद्यार्थ्यांनी नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. पॉलिटेक्निक मधील ४० विद्यार्थी तृतीय वर्षाचा निकाल लागण्यापूर्वीच, नगर येथील नामांकित - व नाशिक येथील बॉश कंपनीत रुजू होणार आहेत. योगेश्वरी पॉलिटेक्निक मधील तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील शेवटचा पेपर दि ३० मे रोजी दिला. त्यानंतर लगेचच दुसऱ्या महिन्यापासून म्हणजे १ जून पासून हे विद्यार्थी या कंपनीमध्ये रुजू होणार आहेत. निवड झालेले विद्यार्थी हे मराठवाड्यातील ग्रामीण भागातील गरीब,होतकरू व मजुरी व्यवसाय करणाऱ्या पालकांचे विद्यार्थी असून, त्यांना महाविद्यालयातूनच कॅम्पस



योगेश्वरी पॉलिटेक्निकचा अभिनव उपक्रम

मुलाखतीतून नोकरी लागल्यामुळे अल्पावधीतच विद्यार्थी कुटुंबाचा आधार बनले आहेत. ही संस्थेच्या दृष्टीने अत्यंत अभिमानाची आहे.

या यशाबद्दल कंपनीमध्ये रुजू होणाऱ्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर, योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे व कंपनीचे प्रतिनिधी अर्जुन कुमार, विद्यार्थी व पालक उपस्थित होते महाविद्यालयाच्या निकालाची परंपरा व गुणवत्तेचा आलेख उंचावण्यासाठी संस्थेतील सर्व प्राध्यापक व कर्मचारी सतत प्रयत्नशिल असतात.विद्यार्थी, विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक संकुलासोबतच, सर्व सोयीयुक्त वसतिगृहे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या यशामागे प्रथम वर्ष विभागप्रमुख प्रा.नारायण सिरसाट, स्थापत्य अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा.रोहित कदम, संगणक विभागप्रमुख प्रा.अतुल फड, यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख व प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा.श्याम गडदे, स्वयंचलित अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा.बप्पासाहेब सोनवणे, आदीसह इतर प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आदींचे परिश्रम आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षित होता यावे, या उद्देशाने सुरू केलेल्या या शैक्षणिक सुविधेचा मराठवाड्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी लाभ घेत असून, चालू शैक्षणिक वर्षात देखील विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी मोठी गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. योगेश्वरी पॉलिटेक्निक हे महाराष्ट्रातील नामांकित तंत्रनिकेतन असून, संस्थेच्या या कार्याबद्दल यापूर्वी महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने उत्कृष्ट नामांकन देऊन देखील या पॉलीटेक्निकचा गौरव केला आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे यापूर्वी महाविद्यालयास मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी केलेल्या शैक्षणिक योगदानाबाबत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे ''विशेष प्रशस्तीपत्र'' देऊन गौरविण्यात आले आहे.

# श्रीक्षेत्र बाभळगाव येथील हनुमान मंदिर देवस्थानचे विश्वस्त मंडळ जाहीर

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यातील जागृत देवस्थान म्हणून सुप्रसिद्ध असलेल्या माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र बाभळगाव येथील हनुमान मंदिराच्या विश्वस्त मंडळाची कार्यकारिणी निवडण्यात आली आहे. धर्मादाय कार्यालयाकडे देवस्थान ट्रस्टची नोंदणी करण्यात आली असून आमदार प्रकाश सोळंके यांच्या उपस्थितीत कार्यकारणी जाहीर करण्यात आली.**



आ.प्रकाश सोळंके यांची उपस्थिती

विश्वस्त मंडळाच्या अध्यक्षपदी शिवाजी तुळशीराम डाके, उपाध्यक्षपदी बाजीराव श्रीमंतराव लाटे, सचिव चंद्रकांत सुरेश लाटे, कोषाध्यक्ष मारुती महाराज सुरवसे, सहसचिव पंजाब राधाकिसन लाटे यांची निवड करण्यात आली आहे. तर इंद्रजीत नामदेव लाटे, अभिनव रामराव लाटे, एकनाथ मदनराव लाटे, अशोक रुस्तमराव लाटे, ज्ञानेश्वर नामदेव जगताप, ज्ञानोबा लक्ष्मण डाके, भारत सर्जेराव लाटे, लक्ष्मण शिवराम सुरवसे, आत्माराम प्रभाकर शिंदे, बळीराम काशिनाथ गोरे, अशोक गिण्यानदेव बचले, हनुमान दिलीप लाटे, सौ शिवकन्या बळीराम डाके, शिवाजी जगन्नाथ भारती, दाजीबा जयवंत उगले, नानाभाऊ सिद्राम लाटे, भगवान गोपाळ बडे, नारायण दामोदर पांचाळ यांची विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. तसेच अंगद मारुती शिंदे यांची पुजारी म्हणून नेमणूक करण्यात आली. शनिवारी या कार्यक्रमासाठी आमदार प्रकाश सोळंके, राष्ट्रवादी कॉंग्रेस (श.प. गट)पक्षाचे नेते मोहनराव जगताप, सामाजिक कार्यकर्त्या विमल होके, माजी जिल्हा परिषद सदस्य अनुसया साळुंखे, विठ्ठल लगड, दत्ता डाके, पांडुरंग झोडगे, बंडू खांडेकर, मनोहर डाके, पांडुरंग सोळंके, भागवत दराडे, प्रदीप ठोंबरे, तलाठी प्रमोद चव्हाण आदी पंचक्रोशीतील मान्यवरांची उपस्थिती होती. येत्या काळात श्रीक्षेत्र बाभळगाव येथील श्री हनुमान देवस्थानच्या सार्वभौम विकासासाठी विश्वस्त मंडळी कार्य करेल असा आशावाद आमदार प्रकाश सोळंके यांनी यावेळी व्यक्त केला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी जयंती निमित्त पिंपळवाडी येथे महिलांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**


राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त पिंपळवाडी ग्रामपंचायत च्या वतीने गावातील विविध क्षेत्रांमध्ये काम करत असणाऱ्या महिलांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा उपक्रम ग्रामपंचायत कार्यालय पिंपळवाडी च्या वतीने आयोजित केला होता. आलेल्या सर्व महिलांच्या हस्ते सर्वप्रथम ग्रामपंचायत कार्यालय पिंपळवाडी च्या समोर अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती अगदी आनंदाच्या वातावरणामध्ये साजरी करण्यात आली.यानंतर पिंपळवाडीच्या सरपंच सौ.शोभा



बाबासाहेब बहिरवाळ यांच्या व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गावातील विविध क्षेत्रांमध्ये गेल्या अनेक वर्षापासून काम करत असणाऱ्या महिलांना अहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाला पिंपळवाडी गावच्या सरपंच सौ.शोभा बाबासाहेब बहिरवाळ, पिंपळवाडी चे ग्रामविकास अधिकारी श्री.नागरगोजे साहेब,पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.नेमाने साहेब अंगणवाडीच्या सौ.बडे मॅडम यांच्या सह ग्रामपंचायतचे सर्व सन्माननीय सदस्य कार्यक्रमास उपस्थित होते.गावातील अंगणवाडी सेविका तसेच अंगणवाडी मदतनीस यांचा यावेळी अहिल्यादेवी होळकर पुरस्कार शाल,

◀◀ पान ३ वर

# डोंगर रांगेतील दगड, बालीमुळे जरेवाडीला धोका



पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील आदर्श गाव जरेवाडी येथे डोंगरावर झालेल्या संततधार पावसाने माती व दगड बाली भिजून गेले आहे.या डोंगरावर मोठ-मोठ्या दगड,बाली असून या डोंगरापासून जवळच जरेवाडी हे शैक्षणिक व सेंद्रिय शेतीत आदर्श असलेले गाव वसलेले आहे.परंतु,या गावाला आता डोंगर रांगेतील मोठ्या बालीपासून धोका निर्माण झाला आहे.बालाघाटच्या या डोंगर रांगेत बेदरवाडी व जरेवाडीच्या मधोमध डोंगर रांगा असून त्यावर मोठ-मोठे दगड आहेत.या दगडामुळे पाऊस पडल्यावर त्या घसरून घरावर पडण्याची दाट शक्यता आहे.याची प्रशासनाने दखल घेऊन लवकरात लवकर डोंगर रांगेतील दगड,बाली दूर कराव्यात अशी मागणी युवा नेते भाऊसाहेब जरे,उद्धव ठाकरे समर्थक प्रा.अशोक पवार,दत्ताभाऊ जरे व गावकऱ्यांनी केली आहे.या गावात जास्त ऊसतोड कामगार व गोरगरीब राहत असून या श्रमजीवींचे आनंदी जीवन डोंगर रांगेतील दगडी बाली मुळे धोक्यात जाऊ शकते.

# समाजप्रबोधनासाठी तळमळीने कार्य करणाऱ्या मान्यवरांचा परळीत सन्मान

## स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मान्यवरांना प्रदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारत देशाला स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता हा मार्ग घटनात्मकरीत्या दाखवून वंचित उपेक्षितांना सामाजिक प्रवाहात आणणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची मशाल तेवत ठेवण्याचे काम समाजातील अनेक घटक आपापल्या परीने तळमळीने करीत असतात. त्यामुळे ही विचारांची मशाल आजही जिवंत आहे. या मशालीला अखंडितपणे तेवत ठेवण्याचे काम करणाऱ्या विविध क्षेत्रातील समाजप्रबोधन करणाऱ्या मान्यवर सामाजिक कार्यकर्त्यांचा नुकताच परळी येथे



सिद्धार्थनगर मधील बौद्ध विहारात अत्यंत प्रेरणादायी वातावरणात सहृद्य सत्कार करण्यात आला. यावर्षीच्या पुरस्कारासाठी शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात काम करणारे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे आणि वैद्यकीय व व्यसनमुक्तीच्या क्षेत्रात अतुलनीय काम करणारे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांना समितीच्या वतीने स्मृतीशेष ईश्वरजी कागदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डॉ बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार देऊन गौरवांकीत करण्यात आले. या

◀◀ पान ३ वर

# पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे प्रशासन कौशल्य, समाजकारण हे देशाच्या प्रगतीसाठी दीपस्तंभ – प्रकाश दुगड




माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांनी प्रचंड संघर्ष करत महिला सक्षमीकरण,, शेतकऱ्यांची कर्जमाफी,प्रशासन कौशल्य राबविले त्यांच्या या गुणामुळे भारताचा इतिहास सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे. असे प्रतिपादन भा. शि.प्र.संस्थेचे केंद्रीय सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड यांनी केले.ते पुण्य श्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या ३०० व्या जयंती निमित्त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या भारतमाता सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या प्रतिमेचे पूजन व मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर श्री सिद्धेश्वर संकुलांचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,

◀◀ पान ३ वर

# अनिल जाधवर एक दिपस्तंभ- डॉ.विक्रम सारुक

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद शाळा गांधीनगर कार्यरत असणारे अनिल जाधवर पदवीधर शिक्षक तथा राज्य अध्यक्ष कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघ हे नियत वयोमानानुसार ३१ मे २०२५ अखेर सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवा कार्याचा गौरव करण्यासाठी सेवागौरव सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक २९ मे २०२५ रोजी हॉटेल निलकमल बीड येथे सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष संजय पंचगल्ले शिक्षणाधिकारी (योजना) हे होते तर प्रमुख पाहुणे सुरेश केंद्रे लेखा व वित्ताधिकारी, ॲड सर्जेराव (तात्या) तांदळे जिल्हा सरचिटणीस भाजपा, दादासाहेब मुंडे कॉंग्रेस महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस, भगवान फुलारी शिक्षणाधिकारी प्राथमिक, डॉ.विक्रम सारुक प्राचार्य डायट,उपशिक्षणाधिकारी उध्दव



सांगळे धाराशिव, भाऊसाहेब सानप प्राध्यापक एमबीए झील कॉलेज पुणे, समंदर खान गटशिक्षणाधिकारी बीड , जमीर शेख गटशिक्षणाधिकारी शिरुर (का), सिध्देश्वर माटे विस्तार अधिकारी, ॲड महेश गर्जे, डॉ.राजीव घुगे, डॉ.संध्याताई घुगे, डॉ.पी.सी.तांबडे, अनिलकुमार होळकर सिने प्रोडयुसर, मिनाक्षीताई होळकर पार्श्वगायिका, श्रीराम बहीर चेअरमन शिक्षक पतसंस्था बीड, विष्णू खेत्रे चेअरमन शिक्षक पतसंस्था गेवराई, मारुती पठाडे, चेअरमन शि.प.सं.आष्टी, दिलीप खाडे सचिव शि.प.सं.पाटोदा, श्री सानप चेअरमन शि.प.सं. शिरुर (का), प्रशासन अधिकारी अनंता खेडकर, प्रवीण येवले, दैनिकाचे उपसंपादक नारायण नागरे नाना, नितिन क्षीरसागर, संघटनेचे नेते सुर्यकांत जोगदंड, नामदेव शिंदे, हरीदास घोगरे, सुरेश ढास, भगवान पवार, उनवणे सर, राजेंद्र लाड, सोन्याबापू शेंडगे इ.उपस्थित होते.

श्री अनिल जाधवर पदवीधर शिक्षक पदावर जिल्हा परिषद शाळा गांधीनगर (मराठी) बीड केंद्र अशोक नगर तालुका बीड येथे कार्यरत होते. ज्ञानादानासारख्या पवित्र अशा शिक्षण क्षेत्रामध्ये जाधवर यांची प्रदिर्घ अशी ३८ वर्षे सेवा घडली. सेवाकालवधीमध्ये कर्तव्य परायणता, तत्पुरता, शिस्त व निटनेटकेपणा संस्कार क्षम गुणवत्ता पूर्ण शिक्षण हे त्यांच्या सेवेचे वैशिष्टये होते. संघटनेच्या वतीने सेवागौरव सन्मानपत्र देऊन जाधवर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच कास्ट्राईब संघटनेमध्ये २५ वर्ष एवढा कालावधी संघटनेच्या विविध पदावर राहून शिक्षक व कर्मचाऱ्यांना न्याय दिला. प्रशासनाला वेळोवेळी धारेवर धरले. प्रशासनाबरोबर कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. जिथे कमी तिथे आंम्ही हे सुभाषित जाधवर यांच्यासाठी निश्चित शोभते. निवृत्ती वेळी जाधवर हे कास्ट्राईब जनरल कर्मचारी संघाच्या राज्यअध्यक्षपदी विराजमान असून आता ते राज्यस्तरावर

◀◀ पान ३ वर

# उन्हाळी बुद्धिबळ शिबिराचा उत्साहात समारोप

माजलगाव । प्रतिनिधी

चेस बेसिक १२३ संस्था संभाजीनगर यांनी आयोजित केलेल्या उन्हाळी बुद्धिबळ शिबिराचा समारोप गुरुवार दि २९ रोजी महाराष्ट्र पत्रकार संघांचे अध्यक्ष उमेश जेथलिया व सातत्य कोचिंग चे संचालक डॉ प्रशांत पत्की यांच्या हस्ते विजेत्यांना मेडल वाटप करून करण्यात आला.

चेस बेसिक १२३ संस्थेचे सौ शुभांगी अमोल कुलकर्णी व विनोद जाधव यांनी माजलगाव शहरातील विध्यार्थी वर्गासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे बुद्धिबळ प्रशिक्षण शिबीर सातत्य कोचिंग क्लासेस टवाणी कॉम्प्लेक्स येथे घेतले होते. हे शिबीर २२ मे ते २८ मे या दरम्यान ७ दिवस चाललेल्या शिबिराचा समारोप २९ मे रोजी करण्यात आला. शेवटच्या दिवशी वयोगटानुसार स्पर्धा आयोजित करण्यात आल्या.यात मोठ्या वयोगटात अ गटात प्रथम रुद्र जेथलिया, सार्थक कुलथे द्वितीय, ब गटात सुकन्या पवार



प्रथम, आयुष गवळी द्वितीय तर क गटात नारायणी पत्की प्रथम सिद्धांत पवार- द्वितीय क्रमांकाचे विजेते ठरले. उत्तेजनार्थ पारितोषिक - विजयालक्ष्मी कुलथे, हर्षवर्धन बडे, संस्कृती भंडारी, अवनी बेद्रे, शिवांश घनवट, सई टेकाळे, प्रीत दुगड या विध्यर्थ्यांना प्रमुख अतिथीच्या हस्ते मेडल देण्यात आले.


This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# निलेश चव्हाणच्या घरातून लता-करिश्मा हगवणेचा मोबाईल जप्त, एक लॅपटॉपही पोलिसांच्या ताब्यात; ‘हाईड’ केलेले व्हिडीओ समोर येणार

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणी पिंपरी चिंचवड पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील एक आरोपी निलेश चव्हाणच्या घरी पोलिसांनी दीड तासाहून अधिक काळ झाडाझडती केली. त्यामध्ये निलेशच्या घरातून शशांक, लता आणि करिश्मा हगवणेचे मोबाईल जप्त करण्यात आले. तर निलेशचा एक लॅपटॉपही पोलिसांच्या हाती लागला आहे. तसेच निलेशचा पासपोर्ट आणि पिस्तुलीचा परवानाही पोलिसानी जप्त केला आहे. या लॅपटॉपमध्ये त्याचे अनेक व्हिडीओ लपवल्याचा संशय पोलिसांना आहे.




वैष्णवी हगवणेच्या बाळाची हेळसांड करणाऱ्या निलेश चव्हाणच्या घरी पोलिसांनी तपास केला. यामध्ये निलेशने त्याच्या तिजोरीत ठेवलेले शशांक, लता आणि करिश्मा हगवणेचे मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतले आहेत. या मोबाईलच्या माध्यमातून वैष्णवी हगवणेच्या संबंधित काही चॅट पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे. तसेच निलेशन कस्पटे कुटुंबीयांना धमकावण्यासाठी वापरलेलं पिस्तुल पोलिसांच्या हाती लागल्याची माहिती आहे.

निलेश चव्हाण हा वैष्णवीची नणंद करिश्माचा खास मित्र आहे. हगवणेंच्या घरच्या भांडणातही निलेश चव्हाण हजर राहायचा. वैष्णवीच्या बाळाला लपवून ठेवत निलेश चव्हाणनंच कस्पटे कुंटुंबीयांना बंदुकाचा धाक दाखवला होता.

नेपाळच्या सीमेवरून मुसक्या आवळल्यानंतर निलेश चव्हाणला न्यायालयात हजर केलं. त्याला ३ जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. वैष्णवीच्या छळामागे काय कट होता, याचा तपास पोलिसांना करायचा आहे. निलेश आणि हगवणे कुटुंबात नेमका काय संवाद झाला होता हेही पोलिसांना जाणून घ्यायचं आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे वैष्णवीला आत्महत्येला प्रवृत्त करण्यासाठी निलेश चव्हाणचा कितपत सहभाग होता, याची चौकशी आता पोलिस करणार आहेत.

# पक्षाचा एक विभाग असल्यासारखे महिला आयोगाचे काम आहे, अध्यक्षांनी स्वत:हून राजीनामा द्यावा -आमदार रोहित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

**राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी** राजकीय वलय असलेल्या व्यक्तीची नियुक्ती करणे चुकीचे आहे. गेल्या काही प्रकरणात आयोगाच्या अध्यक्षांची भुमिका योग्य दिसून आली नाही. पक्षाचा एक विभाग असल्यासारखे आयोगाचे काम कोणी चालवित असेल तर योग्य ठरणार नाही. लोकांच्या आग्रहास्त्व त्यांनी स्वतः हून राजीनामा द्यावा, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदेत केली



महाराष्ट्र राज्य क्रिकेट संघटनेच्यावतीने आयोजित पत्रकार परिषदेनंतर ते बोलत होते. वैष्णवी कस्पटे - हगवणे यांच्या आत्महत्येनंतर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षांबाबत अनेक टिका केल्या गेल्या. त्याबाबत रोहित पवार म्हणाले, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी राजकीय व्यक्तींची नियुक्ती करता कामा नये. या पदावर निवृत्त न्यायाधीश, निवृत्त पोलिस अधिकारीआदी क्षेत्रातील व्यक्तींची नियुक्ती झाली पाहीजे. विधानसभेच्या पुढील अधिवेशनात याबाबत विषय उपस्थित करणार आहोत. महिला आयोगाप्रमाणेच इतर आयोगावर अराजकीय व्यक्तींची नियुक्ती करण्यासाठी नियमावली तयार करण्यासाठी आम्ही प्रयत्न करणार आहोत.

राजकीय व्यक्तीची आयोगावर नियुक्ती झाली तर तेथे राजकारण होणारच असे नमूद करीत आमदार पवार म्हणाले, गेल्या दहा वर्षांत या आयोगाच्या अध्यक्षपदावर काम करणार्या व्यक्ती या राजकीय पक्षाशी संबंधित आहेत. यामुळे महिला आयोग हा आपल्या पक्षाचा विस्तारीत विभाग असल्यासारखे कामकाज केले जात आहे, असा आरोपही त्यांनी यावेळी केला. अतिवृष्टीमुळे शेतकर्यांच्या नुकसानीसंदर्भात कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून केल्या गेलेल्या वक्तव्यांवर आमदार पवार यांनी नाराजी व्यक्त केली. पवार म्हणाले, राज्यात ४० हजार हेक्टरहून अधिक जमिनीच्या शेतकर्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. माणुसकी शुन्य असलेलल्या कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा आणि काय बोलावे याचा क्लास त्यांना लावावा. दररोज नवीन कोट घालायचा एवढेच कोकाटेंना कळते. त्यांना शेतकर्यांचे प्रश्न काय कळणार असा आरोप ही पवार यांनी केला.

# जेजुरीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचा उत्साहपूर्ण सोहळा

**जेजुरी । प्रतिनिधी**

हिदू धर्मरक्षक पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जेजुरी येथील श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने भव्य उत्सव साजरा झाला. या सोहळ्यात जेजुरी परिसरातील ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, पुजारी, नित्यसेवेकरी आणि कर्मचारी यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमेस अभिवादन केले.



महाद्वार पायरी मार्गावरील अहिल्यादेवींच्या पूर्णाकृती पुतळ्याजवळ माजी राज्यमंत्री व पुरंदर-हवेली मतदारसंघाचे आमदार विजय बापू शिवतारे, माजी आमदार अशोक भाऊ टेकवडे, देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त अभिजीत देवकाते, डॉ. राजेंद्र खेडेकर, मंगेश घोणे, ड. विश्वास पानसे, अनिल सौंदडे आणि पोपट खोमणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण, बेल भंडारा आणि पुष्पवृष्टी करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आमदार शिवतारे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर केवळ राज्यकर्त्या नव्हत्या, तर त्या एक विचार, चळवळ आणि स्त्री सक्षमीकरणाचे प्रतीक होत्या.

या सोहळ्यात त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून विश्वस्त मंडळाने ३०० विद्यार्थिनींचे कन्या पूजन केले आणि त्यांना शालेय साहित्य वितरित केले. समस्त ग्रामस्थ, खांदेकरी, मानकरी, पुजारी, नित्य वारकरी, सेवेकरी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. देवसंस्थानतर्फे सर्व मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला. हा सोहळा अहिल्यादेवींच्या कार्याला आणि स्त्री सक्षमीकरणाला प्रेरणा देणारा ठरला.

# कोट्यवधी रुपये पाण्यात..! आठच महिन्यात पुणे-सोलापूर महामार्गाची चाळण; महामार्ग अधिकाऱ्यांची डोळेझाक

**पुणे । प्रतिनिधी**

कोट्यवधी रुपये खर्च करून नूतनीकरण केलेला पुणे-सोलापूर महामार्ग उखडला गेला आहे. त्यामुळे प्रवाशांकडून रोष व्यक्त केला जात आहे.अवघ्या आठ महिन्यातच रस्त्याची अक्षरशः चाळण झाली असून संपूर्ण महामार्गावर खडी पसरली आहे. रस्त्यावर पसरलेल्या या खडीमुळे अपघातास निमंत्रण मिळत आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे करोडो रुपये आज पाण्यात वाहून जात असल्याचा आरोप करत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



हडपसर रवी दर्शन सोसायटी ते मांजरी फार्म पुढे फुरसुंगी फाटा दरम्यान पुणे-सोलापूर महामार्गावर डांबरीकरण करण्यात आले. पूर्वीचा रस्ता अतिशय सुस्थितीत असतानाही त्यावर दुरुस्तीचे (नूतनीकरण) काम करण्यात आले होते. यासाठी करोडो रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे.मात्र ,अवघ्या आठ महिन्यातच झालेल्या इतक्या कमी पावसात देखील हा रस्ता पुरता उखडला गेलाय. त्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाने खर्च केलेले करोडो रुपये पावसाच्या पाण्यात वाहून गेले असेच म्हणावे लागेल. पुणे-सोलापूर महामार्ग महत्वाचा रस्ता आहे. तरी देखील या रस्त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले जात आहे.

पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग सुस्थितीत असताना देखील या रस्त्यावर कोट्यवधी रुपये खर्च करून केलेले डांबरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे, अशी कबुली तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधिमंडळात दिली होती. विधिमंडळ अधिवेशनात आमदार भीमराव तापकीर यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना चव्हाण यांनी ही माहिती दिली होती. काम सुरू असताना मोठ्या प्रमाणावर वाहतूक वर्दळ असल्याने काही ठिकाणी खडी निघून गेल्याचे निदर्शनास आले होते. या ठिकाणचा रस्ता संबंधित कंत्राटदाराकडून पूर्ववत करण्यात आला आहे. असेही त्यावेळी सांगण्यात आले होते. आज प्रत्यक्षात मात्र, हलक्याच पावसात कामाचा दर्जा उघडा पडला आहे.


आठ -नऊ महिन्यापूर्वी रवीदर्शन ते मांजरी फार्म दरम्यान आवश्यकता नसतानाही राष्ट्रीय महामार्गाकडून करोडो रुपये खर्च करून या रस्त्याचे काम सुरू होते. ठेकेदाराकडून काम अतिशय निकृष्ट पद्धतीने होत होते यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकारी श्रुती नाईक यांना प्रत्यक्ष भेटून कामाच्या दर्जाबाबत पत्रही दिले होते व कामाची पाहणी करून ठेकेदाराला काम चांगले करण्यात सांगण्याबाबतही सांगितले होते. मात्र अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.त्याचा परिणाम आज झालेल्या परिस्थितीतून दिसून येत आहे. केवळ अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे जनतेचे करोडो रुपये पाण्यात वाहून जात आहेत.- राहुल शेवाळे, सरचिटणीस, भारतीय जनता पक्ष, पुणे जिल्हा.

पावसामुळे रस्त्यावर पाणी साचून राहत आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या काही व्यवसायिकांनी पावसाळी लाईनमध्ये राडारोडा टाकून बुजवल्याने पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे काही ठिकाणी खडी उघडी पडली आहे .संबंधित ठेकेदाराला नोटीस पाठवण्यात आली, असून खराब झालेल्या ठिकाणी रस्त्याचे काम तात्काळ करण्यात येईल.- अतुल सुर्वे शाखा अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे

# वडाचीवाडी पाझर तलावात अल्पवयीन मुलाचा बुडून मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

फिरायला गेलेला मुलगा वडाचीवाडीमधील पाझर तलावात बुडाल्याची घटना शनिवारी सकाळी घडली. येथील नायकोबा मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या तलावामध्ये हि घटना घडली. तलावात अल्पवयीन मुलाला बुडून जीव गमवावा लागल्याने ग्रामस्थांकडून हळहळ व्यक्त होत आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,आदित्य हनी बाबर (वय-१६ वर्ष, रा. संकल्प सोसायटी, वडाचीवाडी) असे तलावात बुडून मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. आकाश हा सकाळी येथील डोंगर पायथ्याला फिरण्यासाठी गेला होता. येथील पाझर तलावात पोहण्यासाठी उतरला असता तो खोल पाण्यात गेला आणि बुडाला. असे काळेपडळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मानसिंग पाटील यांनी सांगितले.

कोंढवा (बु.) अग्निश्यामक दलाकडून जवळपास तीन तास शोध मोहीम राबवण्यात आली. त्याना ग्रामस्थ रामदास बांदल, नंदकुमार बांदल, सुरज चव्हाण, प्रसाद मोखर, अमोल बांदल, सागर घुले, प्रितेश झेंडे आणि खाजगी पानबुडी निखिल शिवतारे यांनी प्रसंगावधान साधत केलेली मदत कामी आली. तीन तासाच्या अथक प्रयत्नाने आदित्य ला तलावातून बाहेर काढण्यात आले.

यावेळी अग्निश्यामक दलाचे समीर शेख,वाहनचालक संतोष गायकवाड, तांडेल दशरथ माळवदकर, फायरमन-सागर पिसाळ, विश्वजीत वाघ, तुषार कोंडावळे, पंकज ओवाळ, संकेत भोसले कर्मचारी कर्तव्यवर हजर होते.

# जनतेच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरा; प्रदीप देशमुख यांचे राष्ट्रवादी कार्यकर्त्यांना आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहर कार्याध्यक्ष प्रदीप देशमुख यांनी जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी प्रशासनाची वाट न पाहता थेट रस्त्यावर उतरून लोकांचे प्रश्न सोडवण्याचे आवाहन पक्ष कार्यकर्त्यांना केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पुणे शहर कार्यकारिणीच्या मॉडर्न महाविद्यालय येथील बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या बैठकीला मोठ्या संख्येने नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.




बैठकीत १० जून रोजी पक्षाच्या वर्धापन दिनानिमित्त बालेवाडी येथे होणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या जिल्ह्यातील अधिवेशन न भूतो न भविष्यती व्हावे, यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने प्रामाणिकपणे काम करावे, असे देशमुख यांनी सांगितले. ते म्हणाले, पुणे महानगरपालिकेच्या निवडणुका जवळ येत आहेत. पक्षाची सदस्य नोंदणी वाढवण्याबरोबरच प्रत्येक कार्यकर्त्याने जनतेत जाऊन काम करावे. अजितदादांच्या विकासात्मक दृष्टिकोनाची झलक लोकांना दिसली पाहिजे.

आमदार चेतन तुपे म्हणाले, कार्यकर्ता हाच पक्षाचा पाया आहे. त्यांच्यामुळेच पक्षाला यश मिळते. त्यामुळे विविध महामंडळे आणि समित्यांवर कार्यकर्त्यांना संधी द्यावी. मात्र, महायुतीच्या फॉर्म्युल्याचे भान ठेवावे. माजी आमदार सुनील टिंगरे यांनी कार्यकर्त्यांनी जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी कायम आघाडीवर राहावे, असे आवाहन केले.

यावेळी राजलक्ष्मी भोसले, महेश शिंदे, बाबुराव चांदेरे, सुभाष जगताप आणि दत्ता सागरे यांनीही मनोगत व्यक्त केले. बैठकीला दत्ता धनकवडे, वासंती काकडे, बाबा धुमाळ, नंदा लोणकर, अक्रूर कुदळे, प्रमोद निम्हण, सुषमा निम्हण, उषा कळमकर, शशिकला कुंभार, संतोष फरांदे, प्रदीप गायकवाड, शांतीलाल मिसाळ, शैलेश चरवड, रोहिणी चिमटे, हिना मोमीन, जतिन कांबळे, बाबा पाटील, संतोष नांगरे, अभिषेक बोके, राकेश कामठे, शंतनू जगदाळे, नरेश जाधव, राहूल पायगुडे, गोरख भिकूले, रामदास गाढे, संदीप बधे, समीर चांदेरे, समीर शेख, जयदेव ईसवे, हरेश लडकत, विनोद काळोखे, बाळासाहेब आहेर, विनोद पवार, शुभम माताळे, शितल मेदने, राहुल गुंड, पंकज साठे, अशोक जाधव, पुनम पाटील, संगीता बराटे, रूपेश आखाडे, लावण्या शिंदे, सुशांत ढमढेरे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# अंधश्रद्धा, धर्मपरिवर्तनाविरोधात ठोस पावले उचलणार; टाकळी हाजी ग्रामसभेचा ठराव

**टाकळी हाजी । प्रतिनिधी**

अंधश्रद्धा आणि बेकायदेशीर धर्मपरिवर्तन यांसारख्या समाजविघातक प्रवृत्तींना अटकाव घालण्यासाठी टाकळी हाजी (ता. शिरूर) ग्रामपंचायतीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. शुक्रवारी (दि. ३०) झालेल्या ग्रामसभेत या विषयावर सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला.



ग्रामसभा सरपंच अरुणा घोडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. प्रारंभी माजी सरपंच दामूशेठ घोडे यांनी प्रास्ताविक केले आणि गावातील धार्मिक सौहार्द टिकविण्यासाठी कायदेशीर उपाययोजनांची गरज व्यक्त केली. ग्रामविकास अधिकारी राजेंद्र खराडे यांनी या वेळी गावातील विविध विकासकामांचा आणि शासकीय योजनांचा आढावा सादर केला.

या बैठकीत शिवबा संघटनेचे जिल्हाप्रमुख माऊली घोडे यांनी गावकर्यांच्या भावना मांडताना सांगितले की, गावात काही ठिकाणी अंधश्रद्धा पसरवून, आमिष दाखवून तसेच काही नागरिकांच्या दुर्बलतेचा गैरफायदा घेऊन धर्मपरिवर्तनाचे प्रकार घडत आहेत. हे अत्यंत गंभीर असून, त्यावर तातडीने कारवाई होणे आवश्यक आहे.ग्रामपंचायत सदस्य अशोक गावडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. ग्रामसभेला शिवबा संघटना, हिंदू धर्मजागरण समिती, वारकरी संप्रदाय, दिंडी मंडळ, भजन मंडळ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, शेतकरी संघटना व इतर सामाजिक संस्थांचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी शिरूर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# दानपेटी फोडणारा चोरटा स्वारगेट पोलिसांच्या जाळ्यात; ३८ हजारांची रोकड व कटावणी जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

मुकुंदनगर भागातील एका मंदिरातील दानपेटी फोडून ३८ हजारांची रोकड चोरुन पसार झालेल्या चोरट्याला स्वारगेट पोलिसांनी अटक केली. चोरट्याकडून ३८ हजार ४०० रुपये, तसेच कटावणी जप्त केली. महादेव तुकाराम गिरमकर (वय ४२, रा. कवठा, विकासवाडी, ता. श्रीगोंदा, अहिल्यानगर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.



स्वारगेट भागातील मुकुंदनगर परिसरातील एका मंदिराचे दरवाजा तोडून दानपेटीतील ३८ हजारांची रोकड चोरुन नेण्यात आल्याची घटना नुकतीच घडली होती. स्वारगेट पोलिसांना या घटनेची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी मंदिराच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते.

चित्रीकरणात संशयित चोरटा दिसून आला होता. चित्रीकरणाच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला. चित्रीकरणातील चोरट्याचा वावर स्वारगेट एसटी स्थानक परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी गिरमकरला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने मंदिरातील दानपेटी फोडून रोकड चोरल्याची कबुली दिली.परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे, सहायक निरीक्षक राहुल कोलंबीकर, उपनिरीक्षक रवींद्र कस्पटे, शैलेश आलाटे, शंकर संपते, सागर केकाण, अश्रूबा मोराळे, हर्षल शिंदे, सुजय पवार, संदीप घुले, फिरोज शेख, रमेश चव्हाण यांनी ही कामगिरी केली.

# पुण्यात सदाशिव पेठेत कारनं अनेकांना उडवलं, १२ जण जखमी; सर्वजण विद्यार्थी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या सदाशिव पेठेत शुक्रवारी सायंकाळी भीषण अपघात घडला. भावे हायस्कूलजवळ चहाच्या टपरीवर चहा पिण्यासाठी थांबलेल्यांना एका कारने जोरदार धडक दिली. या दुर्घटनेत तब्बल १२ जण जखमी झाले असून सर्वजण एमपीएससीचा अभ्यास करणारे विद्यार्थी असल्याचं समजते. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलंय.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, सदाशिव पेठेतील अतिशय वर्दळीच्या भागात कारने अनेकांना उडवलं. जखमी विद्यार्थी एमपीएससीची तयारी करणारे असल्याची माहिती मिळाली आहे. अपघातानंतर घटनास्थळी विश्रामबाग पोलीस तत्काळ दाखल झाले असून अपघात नेमका कसा झाला याचा तपास सुरू आहे.

ह्युंडाई ऑरा कार चहाच्या टपरीवर थांबलेल्या विद्यार्थ्यांच्या दिशेनं आली. कारने १० पेक्षा जास्त जणांना धडक दिली. या अपघातात विद्यार्थी जखमी झाले असून सर्व जखमींवर संचेती रुग्णालयात तातडीने उपचार सुरू करण्यात आले आहेत. दरम्यान, या घटनेनं खळबळ उडाली आहे.

मद्यपी भरधाव कार चालकाने १३ जणांना उडवले. त्यानंतर कार चालकाने त्या विद्यार्थ्यांना फरफटत नेल्याची घटना सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली. जखमींमध्ये स्पर्धा परीक्षेच्या विद्यार्थ्यांचा समावेश असून, तिघेजण गंभीर जखमी आहेत. कारचालक जयराम शिवाजी मुळे (वय २७, रा. बिबवेवाडी, मूळ रा. मुळज ता. उमरगा, जिल्हा धाराशिव) याला विश्रामबाग पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# पोलीस पाटील हे पोलिसांचे नाक-डोळे-संदीपसिंग गिल

**रांजणगाव । प्रतिनिधी**

पोलीस पाटील हे पोलिसांचे नाक आणि डोळे असून, गावातील अनुचित घटना, संशयित आणि अनोळखी व्यक्तींची माहिती तात्काळ पोलिसांना देणे आवश्यक आहे. तसेच, ग्रामपंचायत प्रशासन, पोलीस पाटील, पोलीस आणि ग्रामस्थांनी नोकरी-व्यवसायानिमित्त येणाऱ्या भाडेकरूंवर कडक नजर ठेवावी, असे आवाहन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी केले. खंडाळे आणि रांजणगाव हद्दीत आढळलेल्या जळालेल्या मृतदेहांच्या तपासासाठी विशेष पोलीस पथक नेमण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.




शिरूर तालुक्यातील पोलीस पाटलांच्या बैठकीत गिल बोलत होते. यावेळी पोलीस पाटलांनी तालुक्यातील काही समस्या मांडल्या. यामध्ये मोटारसायकल चोरीचे वाढते प्रमाण, बिबट्याचा वाढता उपद्रव, बेट भागातील अवैध धर्मांतर, गुर्हाळांमुळे परप्रांतीयांचा वाढता भरणा, चाकण-शिक्रापूर रस्त्यावरील अपघात आणि पुणे-नगर महामार्गावरील वाहतूक कोंडी यांचा समावेश आहे. या समस्यांवर लवकरात लवकर उपाययोजना केल्या जातील, असे गिल यांनी आश्वासन दिले.

गिल यांनी सांगितले की, शाळा-महाविद्यालयांबाहेर टवाळखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी पोलीस तत्पर राहतील. पोलीस पाटलांनी महिन्यातून एकदा गावातील माहिती अधिकाऱ्यांना द्यावी आणि अंमलदाराने आठवड्यातून एकदा गावाला भेट द्यावी. रोमिओंचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामस्थ आणि कुटुंबियांचा सहभाग आवश्यक आहे. मुलींना स्वसंरक्षणाचे धडे द्यावेत, तरुणांनी सायबर गुन्ह्यांपासून सावध राहावे, ग्रामसुरक्षा यंत्रणा कार्यान्वित करावी आणि सर्व ग्रामपंचायतींनी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या.